रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १३५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ मंगळवार, २ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

सीवूड्स्-दारावे स्टेशनच्या नावात करावेही समाविष्ट/२
एक्सप्रेस वेवर अपघातात एकाचा मृत्यू; दोघे जखमी/५
कबड्डी स्पर्धेत ठाणे ग्रामीण, पालघर संघ विजेते/८

## राज्यातील नगरपालिका निवडणुकांसाठी आज मतदान



**मुंबई :** राज्यातील २६४ नगर परिषदा आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी मंगळवारी (दि. २) मतदान प्रक्रिया होणार आहे. यासाठी प्रशासकीय तसेच पोलिसांची पथके सोमवारी मतदान केंद्रांकडे रवाना झाली. राज्यात २४६ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतींची निवडणूक जाहीर झाली होती. २४ नगरपालिकांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत, तर १५४ नगरसेवकपदाच्या निवडणुकाही लांबणीवर पडल्या आहेत. न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. जिथे जिथे निवडणूक पुढे ढकलली तिथे आता २० डिसेंबरला मतदान होईल आणि २१ तारखेला मतमोजणी होणार आहे. राज्यातील उर्वरित ठिकाणांच्या निवडणुका ठरल्याप्रमाणे २ डिसेंबरला नियोजित वेळत होणार असून त्यासाठी तयारी पूर्ण झाली आहे.






(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

### पनवेलमध्ये ४२५० महिलांना घरघंटी व शिलाई मशीन वाटपाचा शुभारंभ

# पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सर्वसामान्यांचा विचार करणारे -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्वसामान्य माणसाचा विचार करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत. महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी विविध योजना अमलात आणल्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व बहिणींनी कुटुंब आर्थिकदृष्ट्या सधन करण्यासाठी या योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे कौशल्य विकसित करावे, स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये पुढाकार घ्यावा आणि आर्थिक प्रगतीसाठी सक्रिय भूमिका बजवावी, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. १) पनवेल मार्केट यार्ड येथे केले.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार आणि प्रयत्नातून प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत घरघंटी व शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला असून या योजनेंतर्गत निवड झालेल्या चार हजार २५० पात्र लाभार्थींना सोमवारपासून शिलाई व घरघंटी मशीन वाटपाचा शुभारंभ झाला. त्या वेळी भाषणातून सर्व बहिणींशी संवाद साधताना ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा खनिकर्म अधिकारी अमर देवेकर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनिता ओव्हळ, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी,




माजी जि.प. सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, संयोजक संतोष पवार, अ‍ॅड. चेतन जाधव आदी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढे म्हटले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपल्यासाठी भावाप्रमाणे धावून आले आहेत. उज्वला योजना, शौचालय, मातृवंदन योजना, आरोग्य योजना, किसान सन्मान योजना, रेशन योजना, नमो सन्मान, प्रधानमंत्री आवास योजना, शैक्षणिक योजना अशा विविध योजनांबरोबरच लाडकी बहीण योजना अमलात आणून सर्व योजना यशस्वीपणे सुरू आहेत. या जोडीने आज वाटप होत असलेल्या यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून स्वयंरोजगाराची उपलब्धी झाली असून त्यामधून आर्थिकदृष्ट्या सर्व बहिणी सबळ होणार आहात. लाडक्या बहिणींना लखपती दिदी करण्याचा संकल्प सरकारने केला आहे आणि त्याची अंमलबजावणी प्रगतीने सुरू आहे.

आज तुम्हाला मिळालेल्या शिलाई मशीन, घरघंटीचा वापर स्वयंरोजगार म्हणून चांगल्या प्रकारे करा. या उपक्रमाच्या माध्यमातून तुम्ही वापरलेल्या यंत्रसामुग्रीचे शासन पातळीवर सर्वेक्षण होणार आहे, असे सांगून स्वयंरोजगाराच्या माध्यमातून ज्या चांगल्या प्रकारे काम करतील, स्वतःच्या कुटुंबाला हातभार लावतील आणि रोजगार मोठा करतील अशा १० बहिणींना स्व. जनार्दन भगत यांच्या नावाने पुरस्कार देणार असल्याची घोषणाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केली. (पान २ वर..)

# आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली उरणचा विकास

### ■ भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे गौरवोद्गार

**उरण : वार्ताहर**

उरणमधील सर्व नागरिकांना माहीत आहे की, आपल्या हक्काचा माणूस आमदार महेश बालदी आहेत. सर्वांना ते सहकार्य करतात. १५ वर्षांपूर्वीचे उरण आणि आताचे उरण आपण पाहतो तेव्हा येथील विकास हा त्यांच्याच नेतृत्वाखाली झाला आहे हे कुणीही नाकारू शकत नाही, अशा शब्दांत भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. ते उरणमध्ये जाहीर सभेत बोलत होते.


उरण नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने भाजप महायुतीची विजयी निर्धार सभा रविवारी (दि. ३०) पालिकेच्या मराठी शाळा प्रांगणात झाली. या वेळी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून योजना, निधीसाठी नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शोभा कोळी-शाह यांच्यासह भाजप



महायुतीच्या सर्व नगरसेवकांना कमळ चिन्हासमोरील बटण दाबून बहुमताने निवडून द्या, असे आवाहन केले.

व्यासपीठावर भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, स्थानिक आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जेष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, युवा नेते प्रितम म्हात्रे आदींसह प्रमुख पदाधिकारी, उमेदवार उपस्थित होते. (पान २ वर..)

### मुख्यमंत्र्यांचा फोनवरून संवाद





या सभेदरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार महेश बालदी यांना मोबाईलवर कॉल करून उरणकरांशी संवाद साधला आणि भाजप महायुतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शोभा कोळी-शाह तसेच नगरसेवकपदाच्या सर्व २१ उमेदवारांना आपला आशीर्वाद देऊन निवडून द्यावे, असे आवाहन केले. आमदार महेश बालदी यांनी सातत्याने विकासाची मालिका लावली आहे. जनसामान्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन आणण्याचा जो त्यांचा प्रयत्न आहे त्यासाठी आम्हीदेखील त्यांच्या पाठिशी आहोत. नगरपालिका पुन्हा त्यांच्याकडे आली, तर आपल्याला वेगाने काम करता येईल, असेही या वेळी मुख्यमंत्र्यांनी आवर्जून सांगितले.



## निवडक

### डिजिटल अरेस्ट प्रकरणांची तपासणी सीबीआय करणार

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि. १) महत्त्वाचा आदेश देत देशभरातील सर्व डिजिटल अरेस्ट प्रकरणांची तपासणी सीबीआयकडे सोपवली आहे. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी दोन आठवड्यांनंतर होणार आहे. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट सांगितले की, राज्यांची पोलीस यंत्रणा सीबीआयला पूर्ण सहकार्य करेल तसेच आयटी इंटरमीडियरी नियम २०२१ अंतर्गत इतर सर्व प्राधिकरणांनाही सहाय्य करणे बंधनकारक असेल.

### चक्क संसदेत कुत्रा घेऊन पोहचल्या काँग्रेसच्या खासदार


**नवी दिल्ली :** संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी एक विचित्र घटना घडली आहे. काँग्रेसच्या राज्यसभा खासदार रेणुका चौधरी या आपल्या पाळीव कुत्र्यासह संसद परिसरात पोहचल्या. त्यांच्या या कृतीने सुरक्षा कर्मचारी, उपस्थित खासदारांना धक्का बसला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

# निवडणुका स्थगित करणे चुकीचे -मुख्यमंत्री

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

नगरपालिकांमधील काही प्रभांगाची निवडणूक राज्य निवडणूक आयोगाने स्थगित केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, निवडणूक आयोगाने कायद्याचा चुकीचा अर्थ लावला आहे. निवडणुका स्थगित करणे हे अत्यंत चुकीचे आहे, असे मत व्यक्त केले आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोणीही न्यायालयात जाईल आणि निवडणूक पुढे ढकलण्यात येईल, असे आजपर्यंत कधीच झाले नाही. निवडणूक आयोग कोणाचा सल्ला घेते याची मला कल्पना नाही. जेवढा मी कायदा बघितला, माझा अभ्यास आहे, वकिलांसोबत बोललो त्या सगळ्यांच्या मतानुसार असे कुणीही न्यायालयात गेले, तर निवडणुका रद्द होत नाही. निलंग्यामध्ये सर्व प्रक्रिया पूर्ण झाली होती. ज्याचे नामनिर्देशन रद्द झाले होते तो न्यायालयात गेला. त्याचे नामनिर्देशन रद्द झाले;



मग अशावेळी ज्यांनी नामनिर्देशन अर्ज दाखल केले त्यांना प्रचाराचा वेळ मिळाला, अर्ज परत घेण्याचा पूर्ण वेळ मिळाला, कुणीतरी पार्टी केली म्हणून निवडणूक पुढे ढकलणे हे अत्यंत चुकीचे आहे. निवडणूक आयोग स्वायत्त आहे. त्यामुळे त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे.

निवडणुकीत महायुतीमध्ये मित्रपक्षांच्या भूमिकेवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, नगरपालिका निवडणूक ही कार्यकर्त्यांची असते. जे कार्यकर्ते आपल्यासाठी राब राब राबतात, हाडाचे पाणी करतात त्यांच्या निवडणुकीत आपण फिरायचे नाही, त्यांना मदत करायचे नाही ही गोष्ट योग्य नाही. नगरपालिका निवडणूक प्रचारात मी मित्र पक्षांवर तर सोडा विरोधकांवरही टीका केली नाही. माझे एक वाक्य सांगा की, मी एखाद्या नेत्याच्या आणि पक्षाचे विरोधात बोललो. या निवडणुकीतील प्रचारात मी सकारात्मक मत मांडत आलो आहे. त्यामुळे कुणावर टीका करत नाही.

मला निवडणूक आयोगाच्या छाप्याबद्दल माहिती नाही. सत्तेत कोणीही असो यावरून छापे ठरत नसतात. आमच्याही कार्यकर्त्यांच्या बाबतीत तक्रार आली तर चौकशी होते, अनेकवेळा माझीही गाडी तपासण्यात आली, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी रात्री उशिरा आलो आणि एकनाथ शिंदे यांच्यापेक्षा लवकर निघालो. त्यांची सभा माझ्यानंतर एक तासाने आहे. त्यामुळे भेट झाली नाही. आम्ही उद्या भेटू. सध्या दोघेही प्रचारात मग्न आहोत. फोनवर आमचे दररोज बोलणे होते.

संजय राऊत बरे झाले ही आनंदाची गोष्ट आहे. ते त्यांचे काम करतात. आम्ही आमचे काम करतो, पण कुणीही आमचा शत्रू नाही. ते राजकीय विरोधक आहे. कुठलाही राजकीय विरोधक आजारी पडला तर तो लवकर बरा झाला पाहिजे ही आमची भावना आहे. आहे. ते रोज काही काही बोलतात, त्यावर मी उत्तर देत नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

### राज्यात भाजप अव्वल स्थानी राहिल

राज्यात होत असलेल्या नगर परिषद व नगरपंचायत निवडणुकीमध्ये नंबर एकचा पक्ष भाजप राहील. त्या खालोखाल आमचे दोन्ही मित्रपक्ष असतील. या निवडणुकीत ७० ते ७५ टक्के जागांवर महायुतीचे तीनही पक्ष मिळून उमेदवार निवडून येतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

# नगरपालिका निवडणुकीसाठी रायगडात यंत्रणा सज्ज



**अलिबाग : प्रतिनिधी**

नगरपालिका निवडणुकीचा प्रचार सोमवारी (दि. १) संपला. रायगड जिल्ह्यातील १० नगर परिषदांसाठी मंगळवारी (दि. २) मतदान होणार आहे. २८१ मतदान केंद्रांमध्ये एकूण दोन लाख ३७ हजार मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार असून मतदान प्रक्रियेकरिता राजकीय पक्षांसोबतच प्रशासनही सज्ज झाले आहे.

जिल्ह्यातील अलिबाग, पेण, मुरुड जंजिरा, रोहा, श्रीवर्धन, महाड, उरण, खोपोली, कर्जत, माथेरान नगरपालिकांसाठी मंगळवारी मतदान होणार आहे. १० नगराध्यक्षपदांसाठी ३४, तर नगरसेवकाच्या २०९ जागांसाठी ५७५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

नगराध्यक्षपदासाठी खोपोलीत सात, महाडमध्ये पाच, श्रीवर्धन व उरण प्रत्येकी चार, मुरूड व पेण प्रत्येकी तीन, तर रोहा, कर्जत, अलिबाग आणि माथेरानमध्ये प्रत्येकी दोन असे एकूण ३४ उमेदवार रिंगणात आहेत. नगरसेवकपदासाठी खोपोलीत ३१ जागांसाठी ११८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

अलिबागेत २० जागांसाठी ४२ उमेदवार निवडणूक लढणार आहेत. श्रीवर्धन पालिकेच्या निवडणुकीत २० जागांसाठी ६० उमेदवार आहेत. मुरूड-जंजिरा पालिकेच्या २० जागांसाठी ५८ उमेदवार राजकीय नशीब आजमावत आहेत. रोह्यात २० जागांसाठी ५१ उमेदवार, महाडमध्ये २० जागांसाठी ५३ उमेदवार, पेणमध्ये २४ जागांसठी ५२ उमेदवार, उरण २१ जागांसाठी ४९ उमेदवार, कर्जत २१ जागांसाठी ४६ उमेदवार, तर माथेरानमध्ये २० जागांसाठी ४६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

जिल्ह्यात १०७ प्रभातून २१७ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. त्यापैकी पेण नगर परिषदेत सहा आणि अलिबाग व रोह्यात प्रत्येकी एक असे एकूण आठ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्यामुळे आता २०९ जागांसाठी मतदान होणार आहे. १० नगर परिषदांमध्ये नगराध्यक्षपदासाठी मतदान होईल. २८१ मतदान केंद्रांवर दोन लाख ३७ हजार ५०३ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावून नगराध्यक्ष व नगरसेवक निवडतील.

दरम्यान, जिल्ह्यात १० नगर परिषदांच्या मतदारयाद्या तपासताना चार हजार १५६ मतदारांची नावे दुबार असल्याचे आढळले आहे. त्यांच्या नावापुढे दोन स्टार करण्यात आले आहेत. त्यांची नावे वगळण्यात आलेली नाहीत. नाव दुबार असले तरी त्यांना मतदान करण्याची संधी देण्यात येणार आहे. दुबार मतदारांना मतदान करण्यापूर्वी मतदाराकडून आपण अन्य कुठेही मतदान केले नसल्याचे प्रतिज्ञापत्र लिहून घेण्यात येणार आहे.

# पनवेल बार असोसिएशनच्या नव्या कार्यकारिणीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांची घेतली भेट




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल बार असोसिएशनने सर्व सदस्यांच्या हिताला प्राधान्य देत एकोप्याने काम करावे आणि वकिलांसाठी अधिकाधिक सुविधांचा विस्तार करावा, अशा शुभेच्छा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सोमवारी (दि. १) नव्या कार्यकारिणीला दिल्या.

पनवेल बार असोसिएशनच्या निवडणुकीत अध्यक्षपदी रत्नदीप पाटील, उपाध्यक्षपदी सचिन म्हात्रे, सचिवपदी प्रल्हाद खोपकर, सहसचिव (महिला राखीव)पदावर दिपाली गावंड, खजिनदारपदी धनराज तोकडे, सहखजिनदारपदी विशाल डोंगरे आणि ऑडिटरपदी भूषण म्हात्रे विजयी झाले. कार्यकारिणी सदस्य म्हणून विजयेंद्र मुंढे आणि इर्शाद शेख, तर महिला राखीव सदस्य म्हणून ज्योती राऊत-उरणकर व छाया म्हात्रे यांची निवड झाली आहे. या निवडणुकीत मनोज भुजबळ यांच्या पॅनलमधील आठ पदाधिकारी विजयी झाले असून दोन्ही बाजूंनी दिलेला लढा अत्यंत सकारात्मक, व्यावसायिकता व सहकार्याची भावना दर्शवणारा ठरल्याचे मत कायदेवर्गातून व्यक्त करण्यात आले. (पान २ वर..)

### एकजुटीने वाटचालीसाठी वकीलवर्गाला शुभेच्छा

## संसदेच्या हिवाळी अधिवेशनात ‘वंदे मातरम्’वर होणार चर्चा

**नवी दिल्ली :** देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रेरणादायी ठरलेल्या वंदे मातरम् गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संसदेच्या हिवाळी अधिवेशनात विशेष चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे. लोकसभेत गुरुवार किंवा शुक्रवारी होणाऱ्या या चर्चेसाठी १० तासांचा वेळ राखून ठेवण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः या विशेष चर्चेत सहभागी होऊन राष्ट्रगीताचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करतील.

संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सर्व पक्षांनी या निर्णयावर सहमती दर्शवली. लोकसभा व राज्यसभेतील बिझनेस अ‍ॅडव्हायजरी कमिटीनेदेखील यास मान्यता दिली. वंदे मातरम् गीत १८७० साली बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी बंगाली भाषेत लिहिले होते. हे गीत त्यांच्या सुप्रसिद्ध कादंबरी ‘आनंदमठ’मधील एक भाग आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत हे गीत क्रांतीकारकांसाठी प्रेरणास्थान ठरले. १९५० साली भारत गणराज्याने अधिकृतपणे याला राष्ट्रीय गीताचे स्थान दिले.

# खोपोलीमध्ये महायुतीचाच गुलाल उधळला जाणार -प्रभारी ॲड. प्रकाश बिनेदार

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली सार्वत्रिक निवडणूक २०२५साठीचे मतदान अवघ्या काही तासांवर येऊन ठेपले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया महायुतीचे प्रभारी माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांनी विजयी आत्मविश्वास प्रकट करत खोपोलीमधील जनमताचा कौल महायुतीच्याच बाजूने असेल, अशी खणखणीत गर्जना केली आहे.



खोपोलीमध्ये महायुतीचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून आणण्यासाठी भाजप प्रदेश कार्यकारिणीमधून रायगड जिल्हा संपर्क प्रमुख, मंत्री आशिष शेलार, रायगड निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली निवडणूक निरीक्षक माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार आणि पनवेल नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष सुनील घरत, अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर निवडणूक प्रचार यंत्रणा सक्षमपणे राबविण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडत आहेत.

खोपोली नगर परिषदेच्या प्रचारामध्ये भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि रिपाई महायुतीची अभेद्य एकीचे भक्कम विराटरूप पाहण्यास मिळाले. अर्थातच एकदिलाने होणाऱ्या प्रचारांमध्ये कुठेही गटबाजीचे गालबोट लागले नाही अथवा कुठेही नाराजीचा सूरदेखील उमटला नाही. आमदार महेंद्र थोरवे यांच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळेला केलेल्या नियोजनाचा अनुभव तमाम कार्यकर्त्यांच्या गाठीशी होता. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरभर कार्यरत असणारे कार्यकर्त्यांचे जाळे आणि जोडीला प्रत्येक मतदारापर्यंत पोहचणारी सजग प्रचार यंत्रणा यामुळे महायुतीच्या प्रत्येक उमेदवाराने प्रचारामध्ये प्रचंड उसळी मारली आहे.

या साऱ्या पार्श्वभूमीवर ३० नोव्हेंबर रोजी झालेल्या महायुतीच्या प्रचार सभेने अत्यंत सकारात्मक आणि विजयास पोषक वातावरण निर्माण केले आहे. या सभेत मूलखमैदान तोफांच्या भाषणापुढे महायुतीला आव्हान देणारे उमेदवार पुरते गार होतील असे मत राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केले आहे. महायुतीच्या महासभेमध्ये वचननाम्यात मांडलेल्या विकासाच्या प्रत्येक मुद्द्यावर अत्यंत अभ्यासपूर्ण भाष्य झाल्यामुळे या सभेने खोपोलीकरांची मते जिंकली आहेत. या सगळ्याचा परिपाक म्हणून महायुतीचे उमेदवार भरघोस मतांनी निवडून येतील, असेदेखील प्रथितयश राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. या सभेमध्ये माजी मंत्री तथा भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने देश, राज्य पातळी आणि स्थानिक समस्या यांचा उहापोह केला. खोपोलीमधील स्थानिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी विजय प्राप्त झाल्यानंतर कुलदीपक शेंडे यांची आमदार महेंद्र थोरवे व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घडवून आणण्याची सर्वस्वी जबाबदारी मी घेतो आहे, असे चव्हाण म्हणताच उपस्थित नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. ते पुढे म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली आमच्या सर्व मित्र पक्षांना व समाजातील प्रत्येक घटकाला सोबत घेत आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहोत महायुतीचे सर्व उमेदवार आपापल्या प्रभागात व नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत महायुती भरघोस मते प्राप्त करतील असा मला विश्वास आहे.

खोपोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी महायुतीचे निरीक्षक माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार आपल्या म्हणाले की पाणी प्रश्न, मेट्रो मार्गिका, उद्योग धंदे, रोजगार, सार्वजनिक रुग्णालयाची अत्यंतीक गरज व अन्य मूलभूत सुविधा हे सारे प्रश्न सकारात्मकरित्या सोडवायचे असतील तर आपले बहुमूल्य मत महायुतीच्या उमेदवारांना द्यावे. खोपोली शहराच्या सर्वांगीण विकासाकरिता महायुतीचा प्रत्येक उमेदवार कटिबद्ध असेल.

आपल्या मिश्किल आणि फिरकीबाज भाषण शैलीतून आमदार महेंद्र थोरवे यांनी राष्ट्रवादीच्या परिवर्तन आघाडीला अपरिवर्तन आघाडी असे संबोधत खिल्ली उडवली. खोपोली शहराचे खरे परिवर्तन जर कोणी करू शकेल तर ते महायुतीचेच उमेदवार करू शकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या भाषणात ते म्हणाले की माजी मंत्री भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे माझ्या गुरुस्थानी आहेत त्यांचे संघटन कौशल्य व महायुतीमधील संतुलित नेतृत्व आगामी काळात अत्यंत महत्त्वाचे ठरेल. शिवसेना पक्षाचे सर्व नेते, पदाधिकारी व भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ॲड. प्रकाश बिनेदार, रिपाई जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड यांच्या नियोजनातून आगामी काळात महायुतीचा विजय घडणारच अशी गर्जना त्यांनी केली.

खोपोली शहरातील प्रत्येक प्रभागात आमदार प्रशांत ठाकूर यांचे कट्टर समर्थक भाजप कार्यकर्ते, पनवेल महानगर क्षेत्रातील अनेक आजी माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रचारात दणकेबाज आघाडी घेतली होती. संवाद चर्चा, प्रचारसभा तसेच व्यक्तीसापेक्ष प्रचार या साऱ्यामध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविल्याने महायुतीच्या सर्व उमेदवारांनी त्यांच्या अतुलनीय योगदानाचे प्रचंड कौतुक केले. नगराध्यक्षपदाचे उमेदवार कुलदीपक शेंडे यांनी निवडणूक प्रचार काळामध्ये महायुतीच्या सर्व मित्र पक्षांनी सोबत येत भाजपच्या संघटन कौशल्याचा मिलाप साधल्यामुळे महायुतीला अधिक लाभ होत असल्याचे निरीक्षण व्यक्त केले. एकदिलाने होणाऱ्या प्रचारामुळे समाधानदेखील व्यक्त केले तसेच महायुतीच्या उमेदवारांसाठी जनतेमध्ये निर्माण होणारा उत्साह पाहता जनमताचा कौल आमच्याच पारड्यात पडेल. महायुतीच्या नगराध्यक्ष व नगरसेवकपदाचे सर्व उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून येतील असा विश्वास व्यक्त करीत आमदार महेंद्र थोरवे व आमदार प्रशांत ठाकूर तसेच महायुतीतील सर्व पक्षश्रेष्ठी यांचे आभार मानले.

## सीवूड्स्-दारावे स्टेशनच्या नावात करावेही समाविष्ट

**नवी मुंबई : बातमीदार**

मध्य रेल्वेने हार्बर लाईनवरील मुंबई लोकल रेल्वे स्टेशन सीवूड्स-दारावे असे नाव बदलून सीवूड्स-दारावे-करावे असे केले आहे. या नावात करावे गावाचे नाव औपचारिकरित्या समाविष्ट केले आहे. स्टेशनचे नाव पहिल्यांदा देण्यात आले तेव्हा करावे नाव वगळण्यात आले होते. गेली २० वर्ष करावे ग्रामस्थ स्थानकाला नाव मिळावे यासाठी मागणी करत होते.

महाराष्ट्र सरकारच्या विनंतीनुसार आणि भारताच्या सर्व्हेअर-जनरलच्या मंजुरीनंतर रेल्वेच्या मुख्य प्रवासी पणन विभागाचे व्यवस्थापक यांच्या कार्यालयाने २९ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या नवीन नावाची अधिसूचना जाहीर केली. नवी मुंबईतील नेरुळ येथील सीवूड्स रेल्वे स्थानक हे दारावे आणि करावे या दोन गावांच्या जमिनीवर विकसित करण्यात आले आहे

स्टेशन सुरू झाले तेव्हा त्याच्या अधिकृत शीर्षकात फक्त सीवूड्स आणि दारावे यांचा समावेश होता. मात्र सिवुड रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडे करावे गाव लागते. सरकारी अधिसूचनेत जमीन नोंदी, शहरी विकास नकाशे आणि वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये प्रशासकीय सुसंगतता सुनिश्चित करण्यासाठी स्टेशनच्या नावात करावेचा समावेश करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर भारतीय सर्वेक्षण संस्थेने तिन्ही लिपींमध्ये मान्यता दिली, जी रेल्वेने आता मराठी, हिंदी व इंग्रजीत सीवूड्स-दारावे-करावे असे अधिसूचित केली आहे.

## परिवहन सेवेचा ट्रॅकर ॲप बंद

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेने प्रवाशासाठी बस ट्रॅकर प सुरू केला होता मात्र मागील आठ दिवसांपासून हा प बंद आह असल्यामुळे प्रवाशी हैराण आहेत.

परिवहन सेवेचा अँप बंद असल्यामुळे प्रवाशांना बस किती वाजता येते त्याचप्रमाणे बस कुठे आहे याची माहिती मिळत नाही. त्यामुळे प्रवाशांना बस थांब्यावर जाऊन ताटकळत बसची वाट पहावी लागत आहे.

याबाबत परिवहन सेवेच्या कार्यालयाशी संपर्क साधला असता त्यांनी आठ दिवसांपासून ॲप्स सुविधा बंद असल्याची माहिती दिली. काही तांत्रिक कारणास्तव ॲप बंद आहे. मात्र मोठ्या प्रमाणात प्रवासी ॲप चा वापर करत असताना आठ दिवसांपासून ॲप बंद असूनही प्रशासनाला याची माहितीच नसल्याने परिवहन सेवेचा कारभार अंदा धुंदी सुरू असल्याचे दिसत आहेत.

## कविता डॉट कॉमच्या वतीने काव्यसंमेलन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

शिव तुतारी प्रतिष्ठान, नवी मुंबई संचलित कविता डॉट कॉम यांचे मासिक कवी संमेलन मराठा भवन वाशी येथे ३० नोव्हेंबर रोजी आगरी कवी पुंडलिक म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यावेळी सुलेखनकार विलास समेळ हे व्यासपीठावर उपस्थित होते.




यावेळी पनवेल, कल्याण, ठाणे आणि कुर्ला आदि ठिकाणाहून आलेल्या कवींनी आपल्या कविता सादर करून रसिकांची मने वेधून घेतली. हरकत काय हो तुमची ही प्रसिद्ध कविता पुंडलिक म्हात्रे यांनी सादर करून टाळ्या घेतल्या. त्यांनी आपला काव्य प्रवास नमूद करुन कवितेचे महत्व एखादी चळवळ सत्व निर्माण करू शकते हे सुचित केले. कुमारी काव्या भोसले यांच्या स्वागत गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमाची गोडी अविट होती.

कवी रुद्राक्ष पातारे यांनी कविता डॉट कॉमचा प्रवास कथन केला तर पाहुण्यांची ओळख आणि कार्यक्रमाचा उद्देश शंकर गोपाळे यांनी स्पष्ट केला. काव्य मैफल सूत्र संचालन नारायण लांडगे पाटील यांनी केले तर शिव तुतारी प्रतिष्ठान अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी आभार व्यक्त करताना कविता ही गुद्‌गुल्या कमी आणि वळवळ न करता एक चळवळ माध्यम बनली पाहिजे हे नमुद केले.

कार्यक्रमास ज्येष्ठ कवी मोहन काळे, निलेश पालेकर, माजी सैनिक शरद पगार, सुरेंद्र पारवे, ज्योती माळी, मनिषा पाटील, दिलीप गोंधळी आणि कविता डॉट कॉम चे सदस्य, सूरज धांद्रुत, कृष्णत संकपाळ, डॉ. शैलजा कोरडे, अरुंधती यादव, चित्रा शिवेकर आणि इतर कवी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## जागतिक एड्स नियंत्रण दिन व पंधरवडा : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई आणि जिल्हाधिकारी व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समितीचे अध्यक्ष किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांच्या नियोजनानुसार १ डिसेंबर जागतिक एड्स नियंत्रण दिनानिमित्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांच्या मार्फत १ ते १५ डिसेंबर दरम्यान विविध जागरूकता उपक्रम राबविण्यात येत असून, त्याचा एक भाग म्हणून आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थी व पथकांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला.



जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी एचआयव्ही/एड्सची कारणे, प्रतिबंधक उपाय, गैरसमज आणि एआरटी उपचार पद्धती याबाबत वैज्ञानिक माहिती दिली. लग्नापूर्वी ब्रह्मचर्य पाळणे, वैवाहिक नात्यात निष्ठा राखणे, तसेच संसर्गाचा धोका असल्यास लैंगिक संबंधांच्या वेळी निरोधाचा वापर करणे याचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून सांगितले.

तसेच आयसीटीसीच्या माध्यमातून जिल्ह्यातील २५० शाळा, २३० गावे आणि ४६ महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यशाळा घेण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. जागतिक एड्स पंधरवड्यानिमित्त ५ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता बाईक रॅलीचे आयोजन करण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांनी एचआयव्ही, हिपॅटायटिस बी,सी किंवा इतर कोणत्याही संसर्गजन्य आजाराने बाधित व्यक्तींशी भेदभाव न करता मानवतावादी दृष्टिकोनातून वागण्याचे आवाहन केले.महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.पूर्वा पाटील यांनी विद्यार्थ्यांनी एड्सविषयी सजग राहून निरामय जीवनशैली अंगीकारावी, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना एड्सची मूलभूत माहिती, संक्रमित व्यक्तींचे हक्क, सकारात्मक जीवनशैली आणि देशाच्या विकासावर होणारा परिणाम याबाबत मार्गदर्शन देण्यात आले.

पान १ वरुन

## पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सर्वसामान्यांचा विचार करणारे -आमदार प्रशांत ठाकूर

आपल्या परिसरात विमानतळ आले आहे आणि त्या अनुषंगाने हजारो कामगार आतमध्ये, तर तेवढेच कामगार बाहेरही काम करणार आहेत. त्यामुळे त्यांना अनेक गोष्टींची आवश्यकता लागणार आहे. येथील व्यवसाय दहा पटीने होणार आहे. ती आवश्यकता लक्षात घेऊन रोजगार वृद्धिंगत करता येणार आहे. सन २०२९मध्ये लोकसभा निवडणुकीत तब्बल ३३ टक्के महिलांना आरक्षण मिळणार आहे. त्यामुळे जवळपास १८१ महिला खासदार होणार आहेत. ही अत्यंत चांगली बाब असून पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःची प्रतिष्ठा पणाला लावून सर्व बहिणींसाठी योजना आणल्या आहेत. त्यामुळे सर्व बहिणींनी आपला आशीर्वाद त्यांना द्यावा, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केले. त्याचबरोबर ही योजना यशस्वी करण्यासाठी काम करणाऱ्या अधिकारी व सहकाऱ्यांचे त्यांनी आभार मानत त्यांना धन्यवाद दिले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी म्हणाले की, महिला सक्षमीकरण व्हावे यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढाकार घेतला आहे. महिला सबलीकरणासाठी रत्नाताई घरत आणि महिला पदाधिकारी सातत्याने विविध रोजगार प्रशिक्षण, कार्यशाळा उपक्रम राबवित आल्या आहेत आणि त्यासाठी सतत योजनांचा मागोवा घ्यायच्या. त्यांनी अनेक महिलांना स्वयंरोजगार मिळवून दिला. त्यांना पाठिंबा देण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. फक्त पनवेलच नाही, तर संपूर्ण रायगडमध्ये त्यांना प्रशांतदादाच बोलतात. दादाच आमचे काम करू शकतो ही भावना प्रत्येकाच्या मनात आहे. म्हणून लहानापासून थोरांपर्यंत त्यांना प्रशांतदादा म्हणून बोलतात. याआधी एवढ्या मोठ्या प्रमाणात असा यंत्रसामुग्री वाटपाचा कार्यक्रम कुठेच पहायला मिळाला नाही. सर्व नियोजन केल्यानंतरच महिलांकडून अर्ज मागविण्यात आले. तुमच्यासाठी प्रशांतदादांनी नियोजन करून हा उपक्रम राबविला आहे. आणखी योजना मिळतील, कारण तुमच्या हक्काचा दादा तुमच्या पाठीशी ठामपणे उभा आहे, असे सांगतानाच महिला मोर्चाच्या वतीने विविध प्रशिक्षणे दिली जातील, असेही त्यांनी या वेळी आश्वासित केले.

राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनीही मार्गदर्शन केले. आपल्याला मिळालेल्या यंत्रसामुग्रीचा योग्य वापर करून स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक स्तर उंचवा, असे सांगून या उपक्रमातून एक प्रकारे चार हजार महिलांना रोजगार उपलब्ध झाला असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम यांनी आपल्या भाषणात महिलांच्या दृष्टिकोनातून हा स्वप्नपूर्ती सोहळा असल्याचे सांगून दमदार आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वयंरोजगाराचे प्रत्यक्षात स्वप्न साकार केल्याचे सांगितले.

दरम्यान, महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येत असलेला हा उपक्रम पनवेल मतदारसंघातील घरगुती उद्योगांना नवी दिशा देणारा ठरत आहे. महिलांच्या हाती रोजगाराचे साधन दिल्यास त्यांच्या कुटुंबाच्या उन्नतीपासून समाजाच्या प्रगतीपर्यंत मोठा सकारात्मक बदल घडतो. त्याची जाणीव ठेवूनच आमदार प्रशांत ठाकूर यांनी या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी संबंधित प्रशासनाशी सतत पाठपुरावा केला. या उपक्रमासाठी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठानकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला. योजना पारदर्शक राहावी यासाठी इच्छुक महिलांकडून घरघंटी किंवा शिलाई मशीनसाठी अर्ज मागविण्यात आले. या अर्जांची व कागदपत्रांची शासकीय निकषांनुसार पडताळणी करण्यात आली आणि नियमांनुसार पात्र ठरलेल्या महिलांना मशीन आणि प्रमाणपत्रांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. या माध्यमातून पनवेल मतदारसंघातील महिलांच्या आर्थिक प्रगतीस चालना देणारे आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले असून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी मार्ग अधिक व्यापक झाला आहे. त्यामुळे महिलांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार व्यक्त करण्यात आले. यापुढील टप्प्यातही हा प्रकल्प राबविण्यात येणार असून इच्छुक महिलांनी नोंदणी केल्यास आगामी आर्थिक वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीतून त्यांना लाभ मिळू शकणार आहे.

## आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली उरणचा विकास

या वेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी उरण तालुका अध्यक्ष जे.डी. जोशी, महालण विभागाचे माजी अध्यक्ष यशवंत म्हात्रे तसेच दिघोडे गावचे शेकापचे ज्येष्ठ नेते अनंत कोळी यांनी कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व इतर मान्यवरांनी स्वागत केले.

आपल्या भाषणात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, मी असेन, आता जे.एम. म्हात्रे यांना आमदार महेश बालदी यांनी हक्काने कोणतीही गोष्ट सांगितली की कुणीही नाही म्हणत नाही. सर्वांचे ते आवडते आहेत. असे फार कमी लोकं असतात त्यांना सगळं मिळतं, पण ते स्वतःसाठी काही घेत नाही, तर उरणमधील जनतेसाठी रोज दिवसातून एखादा पूल मागतात, नाही तर रस्ता मागत असतात. काम मार्गी लागत नाही तोपर्यंत त्याचा ते पाठपुरावा करतात. उरणसाठी विकासात्मकदृष्ट्या जे जे आवश्यक आहे ते मिळवण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न असतो. म्हणूनच त्यांच्या नेतृत्वाखाली उरणचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करून येथील पालिकेत केंद्र व राज्यांच्या विचारांची सत्ता पुन्हा येणे आवश्यक आहे.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी आपल्या आक्रमक भाषणात विरोधकांचा समाचार घेत पोलखोल केली. त्याचप्रमाणे विकासाचा संपूर्ण पट मांडला. ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, सीमा घरत, नगराध्यपदाच्या उमेदवार शोभा-कोळी शाह आदींही विकासाचा वेध घेत उरणकरांना विजयाचे साकडे घातले.

सभेला भाजप राज्य परिषद सदस्य व नगरसेवकपदाचे उमेदवार रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष तथा उमेदवार सायली म्हात्रे, उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत घरत, कामगार नेते सुधीर घरत, महालण विभाग अध्यक्ष महेश कडू, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, जासई विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, शहर शहराध्यक्ष संपूर्णा थळी, भाजप तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, मुकुंद गावंड, सरचिटणीस सुनील पाटील, संपर्क प्रमुख करण ठाकूर, रेय्यान तुंगेकर यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल बार असोसिएशनच्या नव्या कार्यकारिणीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांची घेतली भेट

निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. मनोज भुजबळ हे पनवेलमधील ज्येष्ठ व अत्यंत अनुभवी वकील असून या क्षेत्रातील त्यांचा दांडगा अनुभव सर्वांसाठी मार्गदर्शक ठरेल. नवी कार्यकारिणी त्यांच्या सल्ल्याचा लाभ घेत संघटनेला अधिक सक्षम करेल, असे मत या वेळी पनवेल बार असोसिएशनचे नवनियुक्त अध्यक्ष रत्नदीप पाटील यांनी व्यक्त केले, तर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्वांना शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. त्यानुसार नव्या पदाधिकाऱ्यांनी परस्पर सहकार्याने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## सीकेपी मंच, मुलुंड या संस्थेचे स्थापना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञातीची एक भव्यदिव्य वास्तु मुलुंडमध्ये स्थापित करण्याच्या ध्येयाने केतन गुप्ते यांच्या निवासस्थानी विशेष बैठकीचे आयोजन केले होते,त्यात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञाती मंच, मुलुंड, ह्या संस्थेचे स्थापना करण्यात आली

यावेळी कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात आले आहे,त्यामध्ये संस्थापक आणि संचालक,चंद्रशेखर देशमुख, केतन गुप्ते आणि अमोल गुप्ते.अध्यक्ष ओंकार अजय गुप्ते. कार्यवाह योगेश देशमुख.खजिनदार अमृता गुप्ते.कार्यकारणी सदस्य, मिलिंद अधिकारी प्रशांत गुप्ते , गौरी कर्तकर/ गुप्ते ,कु. सुरुची प्रधान यांची निवड करण्यात आली

तसेच नूतन संस्थेची घटना, उद्देश, सभासद शुल्क, संस्था स्थापनेच्या कार्यक्रमाचे प्रमुख आथिती, पहिल्या कार्यक्रम विषय, वगैरे सविस्तर चर्चा करुन निर्णय झाले, संस्थेचा स्थापनेचा लहानसा पहिला कार्यक्रम जानेवारी २०२६ मध्ये आयोजित करण्याचा ठराव मंजूर झाला आहे,

### दुखवटा

**बळीराम मुंबईकर**



**उरण :** वेश्वी गावचे सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर यांचे वडील बळीराम तुकाराम मुंबईकर यांचे गुरुवार २७ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी पाच मुलगे, सुना,नातवंडे पंतवंडे असा मोठा कुटुंब परिवार आहे.त्यांचे दशक्रिया विधी शनिवार ६ डिसेंबर रोजी उरण माणकेश्वर येथे होणार आहे आणि उत्तरकार्य मंगळवार९ डिसेंबर रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार आहे.

## निवडक

### रेल्वे मोटरमनला ५५ लाखांचा गंडा

**पनवेल :** रेल्वेच्या मोटरमनला ५५ लाखांचा गंडा घातल्याची घटना घडली आहे. रेल्वेच्या मोटरमनला फेसबुकवर शेअर मार्केटसंबंधीची जाहिरात दिसली. त्यांनी जाहिरातीतील लिंक उघडली असता त्यांना देशाबाहेरील नंबरवरून फोन येणे सुरू झाले. त्या व्यक्तींकडून ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवणूक करून अधिकाधिक नफ्याचे आमिष सांगण्यात आले. त्याला भुलून मोटरमनने ५५ लाख ६७ हजार रुपये अज्ञाताच्या बँक खात्यावर पाठवले होते, मात्र त्यांना सतत तोटा झाल्याचे सांगून पैशांची मागणी होऊ लागली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली.

### उरणमधून एक जण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक जण कोठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात करण्यात आली



आहे. सोहम सुशिल शिरढोणकर (वय ३० वर्षे रा.उरण) असे या व्यक्तीचे नाव असून रंग गोरा, उंची अंदाजे सहा फुट, चेहरा-गोल, डोळे काळे, डोळ्यात चश्मा, छातीवर जुनी जखम, अंगात मेहंदी रंगाचा टि-शर्ट, ब्लु जिन्स पॅन्ट, पायात सेंडल, मराठी व हिंदी भाषा बोलता येते. सोबत एमआय कंपनीचा मोबाईल फोन आहे. या व्यक्तीला कोणाला माहिती असल्यास त्यांनी उरण पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

### लोकशाही दिनी तक्रारींचे निवारण

**पनवेल :** आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले. यात नागरी सेवा सुविधा विभाग, कळंबोली, नावडे प्रभाग अशा विविध विभागातील एकुण पाच अर्ज दाखल झाले होते, या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या. बैठकिस परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, उपअभियंता विलास चव्हाण, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, प्रभाग अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये हवा प्रदूषण नियंत्रण मोहीम

## महापालिकेतर्फे १६९ बांधकामांना नोटीस ▌ फॉग कॅनन वाहनाद्वारे पाणी फवारणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढत्या हवा प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी पनवेल महापालिकेमार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येत आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानूसार शहरातील सर्व प्रभागांमध्ये तपासणी, कारवाई आणि यंत्रणांची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू आहे. न्यायालयीन निर्देश व पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने पालिकेने प्रदूषण नियंत्रणाचे उपक्रम अधिक गतीमान केले आहेत.

खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा व पनवेल या प्रभागांमध्ये उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथके नियुक्त करण्यात आली असून बांधकाम व्यावसायिकांकडून धूळ नियंत्रणासंबंधी शासन नियमांचे पालन होते का याची खातरजमा करण्यात येत आहे. नुकतीच कामोठे आणि खारघर प्रभाग समिती क्षेत्रातील विविध बांधकाम



स्थळांची पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान उपायुक्त स्वरूप खारगे यांनी हवा प्रदूषण नियंत्रणासाठी उच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या १५ मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे बांधकाम स्थळांवरील उपाययोजनांची प्रत्यक्ष तपासणी केली.

महापालिका प्रशासनाने प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पालिका क्षेत्रातील बांधकाम व्यावसायिकांना एकूण १६९ नोटिसा बजावल्या आहेत.

प्रत्येक प्रभागात स्थापन करण्यात आलेल्या समित्या नियमांचे पालन न करणाऱ्या बांधकामांवर थेट कारवाई करत असून त्यांचा अहवाल आयुक्तांना सादर केला जात आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी फॉग कॅनन या वाहनांद्वारे पाणी फवारणी हवेतील धुळीचे प्रमाण नियंत्रणात आणण्यासाठी महापालिका आयुक्त चितळे यांच्या निर्देशानूसार खारघर, तळोजा, कामोठे- कळंबोली व पनवेल येथे चार फॉग कॅनन या वाहनांद्वारे दररोज ५० किमीपर्यंत तुषार फवारणी करून हवेतील धूळ नियंत्रण केले जात आहे. या या गाड्यावरती जीपीएस ट्रँकींग सिस्टीमही बसविण्यात आली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील तळोजा एमआयडीसी भागात, कामोठे जव्हार इंडस्ट्रीयल व पनवेल इंडस्ट्रीयल भागात विविध कंपन्यामुळे परिसरामध्ये होणारे हवेच्या प्रदूषणाचे मोजमाप करण्यासाठी ,पनवेल शहरातील निवासी भागामधील हवेतील विविध घटकांची पातळी आणि हवामान घटकांचे निरीक्षण/ मोजमाप करून नागरिकांना अचूक माहिती देण्यासाठी मंकी पॉइंट, उत्सव चौक, IGPL नाका, कळंबोली प्रवेशद्वार, कामोठे पोलीस स्टेशन, संताजी महाराज जगनाडे चौक व वडाळे तलाव अशा ०७ ठिकाणी रिअल टाईम अम्बिएंट एअर क्वालिटी डस्ट मॉनिटर ॲण्ड मेट्रॉलॉजिकल पॅरामिटरर्स स्थापित करण्यात आले आहेत.

सध्या कोपरागाव, खारघर, राणी लक्ष्मीबाई चौक, नावडे, लेबर नाका, कळंबोली, एमजीएम हॉस्पिटल समोर, कामोठे प्रवेशद्वार अशा पाच ठिकाणी एअर प्युरिफिकेशन सिस्टीम कार्यरत आहेत. तर आणखी पाच ठकाणी एअर प्युरिफिकेशन सिस्टीम बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

| प्रभाग | नोटीस संख्या |
|---|---|
| प्रभाग समिती - अ (खारघर) | १९ |
| नावडे उपविभाग | ३८ |
| प्रभाग समिती - ब (कळंबोली) | ३५ |
| प्रभाग समिती - क (कामोठे) | १९ |
| प्रभाग समिती - ड (पनवेल) | ५८ |
| एकुण | १६९ |

# डॉ. आरीफ दाखवेंना पाच वर्षांची सक्तमजुरी व दंड

## पनवेल सत्र न्यायालयाचा महत्त्वाचा निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल सत्र न्यायालयाने डॉ. मोहम्मद आरीफ दाखवे यांना एका प्रकरणात एकत्रित पाच वर्षांची सक्तमजुरी आणि एक लाख १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

डॉ. मोहम्मद आरीफ दाखवे होमीओपॅथी डॉक्टर असून ॲलोपॅथी प्रॅक्टीस करीत होते. बारापाडा कासारभाट दवाखाना येथे पेशंट मयत झाल्याने डॉ. मोहम्मद आरीफ दाखवे यास पनवेल येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी.ई. कोठलीकर यांनी १ डिसेंबर २०२५ रोजी इं.पि. को. क. ३०४ अन्वये व महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीशनर ॲक्ट कलम ३३ अन्वये दोषी ठरविण्यात आले. त्यानुसार डॉ. दाखवे यांना पाच वर्षांची सक्षम कारावासाची शिक्षा व १,१०,००० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे.

गुन्ह्याची थोडक्यात हकिगत अशी की, बारापाडा येथील व्यक्ती रवींद्र पाटील यास ताप आल्याने तो बारापाडा येथील डॉ. मोहम्मद आरीफ दाखवे यांच्या कासारभाट येथील दवाखान्यात गेला होता. त्या वेळी डॉक्टरने त्यास ओवॉरीन हे वेदनाशमक इंजेक्शन



दिल्याने त्यांच्या कंबरेखाली Gas Gangring होऊन तो दहा दिवसांत मृत्यू पावला. होमिओपॅथी डॉक्टर असल्याचे माहिती असतानाही व ॲलोपॅथीचा कोर्स केला नसतानाही रवींद्र पाटील यांना इंजेक्शन दिले आणि मयताच्या मृत्यूस कारणीभूत ठरून मेडीकल प्रॅक्टिशनर कायद्याचा भंग केला. त्यामुळे डॉ. मोहम्मद आरीफ दाखवे यांच्याविरूध्द पनवेल तालुका पोलीस ठाण्यात मयत व्यक्तीचा भाऊ महेश पाटील यांनी सन २०१६ साली गुन्हा रजि. नं. ५६/२०१७, सत्र खटला क. ३२३/२०१९ अन्वये तकार दिली होती. तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक अभय महाजन यांनी भारतीय दंड संहिता कलम ३०४ व मेडीकल प्रॅक्टिशनर ॲक्ट सेक्शन ३३खाली गुन्ह्याचा कसून तपास करून कोर्टात दोषारोप पाठविले. या खटल्याची सुनावणी गेल्या दीड वर्षापासून सुरू होती. सरकार पक्षातर्फे एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. सिव्हील सर्जन अलिबाग यांची व डॉ. पटेल पनवेल तसेच मयताचा मित्र महेंद्र म्हात्रे यांची साक्ष महत्त्वाची ठरली.

चालू दुनियेत आपल्या देशात बोगस डॉक्टरांचा व कोर्स नसताना ॲलोपॅथी प्रॅक्टीस करणाऱ्या डॉक्टरांचा सुळसुळाट झाल्याचे भयाण वास्तव सरकारी वकील वाय.एस. भोपी यांनी न्यायालयासमोर मांडले. सरकारी वकीलांचा युक्तीवाद व आलेला पुरावा मान्य करून न्यायालयाने आरोपीस एकत्र पाच वर्षे सक्षम कारावास व १,१०,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. हा निकाल समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. अशा काही प्रॅक्टीसमुळे अनेक लोकांचा जीव जात असल्याने बोगस डॉक्टरांना ही मोठी चपराक असल्याचे बोलले जात आहे. अनेकांनी या निकालाची महत्त्वाची गरज होती, असे मत व्यक्त करून आनंद व्यक्त केला आहे.

खटला सिध्द करण्यासाठी सरकारी वकील वाय.एस. भोपी, पोलीस निरीक्षक अभय महाजन, हवालदार सुनील केदार व विष्णू पाटील यांचे मोलाचे योगदान लाभले.



**उलवे : सेक्टर १६ येथे साईनाथ भगत यांनी पनू बलून डेकारेशन नामक इव्हेन्ट पार्टी अरेंजमेंटचे दुकान सुरू झाले आहे. यानिमित्त भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले.**

# भाजप महायुतीची उरणमध्ये भव्य मतदार जागृती रॅली





**उरण : वार्ताहर**

उरण शहरात महायुतीची मतदार जागृती रॅली सोमवारी (दि.१) रोजी काढण्यात आली. श्री राघोबा देव मंदिर येथून सुरुवात झाली. पुढे बाजारपेठ, मुस्लिम मोहल्ला, महात्मा गांधी पुतळाजवळ, स्वामी विवेकानंद चौक, एन.आय.हायस्कूल, कामठा, पालवी हॉस्पिटल, बालई रोड, बाजार पेठ, राजपाल नाका, गणपती चौक, पुढे आमदार महेश बालदी संपर्क कार्यालय येथे या रॅलीचा समारोप करण्यात आला.

# फुंडे विद्यालयात जागतिक एड्स दिन



**उरण : रामप्रहर वृत्त**

जागतिक एड्स दिनानिमित्त तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे विद्यार्थ्यांना जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमात जीवशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका प्रीती ठाकूर यांनी एड्स आजाराची लक्षणे, संक्रमण टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, तसेच एचआयव्ही/एड्सविषयी योग्य माहिती असणे का आवश्यक आहे, याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच जागतिक एड्स दिन साजरा करण्या मागील उद्दिष्ट व पार्श्वभूमी यावरही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य बी. बी साळुंखे व उपमुख्याध्यापिका एस. डी. थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. या वेळी सायन्स विभागप्रमुख प्रा. झुंजार माने, दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकचे संचालक प्रा. किशोर पाटील, प्रा. अरुण देवरे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल प्रभाग १९मधील खड्डे बुजवण्याची मागणी

## दर्शना भोईर यांचे मनपा आयुक्तांना पत्र



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका प्रभाग १९ मधील रस्त्यावरील कॉंक्रीटीकरण करण्यात आलेल्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावे, अशी मागणी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी मनपा आयुक्तांना पत्र दिले आहे.

दर्शना भोईर यांनी निवेदनात म्हटले आहे की, प्रभाग क्र.१९ मधील अनेक रस्ते कॉंक्रीटीकरण केलेले आहेत. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले असून वाहनाची ये-जा होताना अनेक छोटे मोठे अपघात होत आहेत. अशा प्रकारे नागरिकांना गैरसोयीस सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविणे आवश्यक आहे.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्हॉईस ऑफ वूमन-ओपन माईक सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथीव रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.१) वूमेन डेव्हलपमेंट सेलच्यातर्फे व्हॉईस ऑफ वूमन-ओपन माईक सत्राचे आयोजन केले होते. या सत्राचा उद्देश विद्यार्थिनींना त्यांचे विचार, कौशल्ये तसेच जीवनातील अनुभव मोकळेपणे आणि एक सुरक्षित व प्रोत्साहनपर व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता.

या सत्रासाठी प्रमुख अतिथी म्हणून संगणक शास्त्र विभागाच्या प्रमुख प्रा. रिझवाना मोमीन यांनी उपस्थिती लावली तसेच त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थिनींमध्ये



उर्जा आणि आत्मविश्वास वाढीस लागला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

या सत्राचे आयोजन वुमन डेव्हलपमेंट सेलच्या समन्वयक प्रा. सोनी पांडे यांनी केले तसेच समितीतील इतर सदस्य प्रा. शीतल चव्हाण, डॉ. पूजा लांजेकर, प्रा. तनुजा सुमन आणि प्रा. मनीषा शिलेदार व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम सुरळीत पार पाडला.

# कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे आयटीएमच्या स्पर्धेत घवघवीत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयटीएम अर्थात इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट खारघर यांच्यातर्फे १२ ते १५ नोव्हेंबर या कालावधीमध्ये ज्युनि. कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी काही वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धा घेतल्या गेल्या. या विविध स्पर्धांमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनि. कॉलेज कामोठेच्या विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले. या स्पर्धांमध्ये बैठे खेळ, स्टार शेफ, फॅशन शो, नृत्य, स्पर्धा, गायन स्पर्धा व बॉक्स क्रिकेट आदी स्पर्धांचे आयोजन केले गेले होते.

या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालये सहभागी झालेले होती. या सर्वामधून लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनि. कॉलेज कामोठेच्या विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग तर घेतलाच शिवाय विविध स्पर्धांमध्ये यशही संपादन




केले. प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नेहमीच प्रवृत्त करत असतात.

आयटीएमच्या स्पर्धेत फॅशन शो सुद्धा घेतले जातात. केवळ स्पर्धा नव्हे तर सहभागी विद्यार्थ्यांनाही यामध्ये प्रोत्साहन दिले जाते. संपूर्ण नवी मुंबई मधून या स्पर्धेसाठी विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झालेले होते. या सर्व महाविद्यालयातून कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेजला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.या वेळी आयटीआयतर्फे विद्यालयाला स्पीकर आणि माईक हे पारितोषिक मिळालेले आहे. सहा प्रकारच्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवलाच नाही तर यशही मिळवले इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट खारघर या महाविद्यालयाचे प्राचार्य सागर चित्रे तसेच प्रोफेसर पूर्वा तावडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे व प्राचार्यांचे अभिनंदन केले. तसेच विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनीदेखील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व विद्यार्थ्यांना भविष्यातही असेच उज्वल यश मिळावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

पर्यवेक्षिका सारिका लंजूडकर, नेहा खन्ना, मिनल नाईक सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात कुक विदाऊट फ्लेम स्पर्धा उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी विभागातील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात २९ नोव्हेंबर रोजी पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या माता पालकांसाठी खास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यात विषेश म्हणजे कुक विदाऊट फ्लेम म्हणजेच आगीशिवाय पदार्थ बनवणे यामध्ये पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या अनेक माता पालकांनी सहभाग नोंदवाला.

या स्पर्धेमध्ये सहभागी माता पालकांनी वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ बनवले, त्यात



वेगवेगळ्या फळांपासून सॅलड बनवणे, वेगवेगळ्या फळांचा ज्यूस बनवणे, गोड पदार्थ बनवणे अशा अनेक गोष्टींचा समावेश होता. सहभागी स्पर्धक माता पालक यांनी वेगवेगळे प्रकारचे पदार्थ बनवत इतर पालकांचे तसेच उपस्थित मान्यवरांचे लक्ष वेधले.

या वेळी मेघना कडू (डेप्युटी मॅनेजर रिलायन्स जिओ अँड पेशेनेट फूड कन्टेन्ट क्रियेटर) खास उपस्थित होत्या. तसेच विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, सुनील पाटील (कमिटी मेंबर), सीमा घरत (कमिटी मेंबर) आदी उपस्थित होते. या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी माता पालकांचे अशा अनोख्या स्पर्धेमध्ये स्वागत करत कौतुक केले.

## संपादकीय

# भाषिक वारशाचा ऱ्हास

सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी भारतीय भाषांच्या सद्यस्थितीकडे रविवारी एका कार्यक्रमात बोलताना लक्ष वेधले. काही भारतीयांना स्वत:ची भारतीय भाषा देखील येत नाही. मग येणाऱ्या पिढीला आपल्या भाषा कोण शिकवणार असा रास्त प्रश्न सरसंघचालकांनी विचारला. समाजाने भाषिक वारशाच्या ऱ्हासावर आत्मपरीक्षण करावे असे आवाहनही त्यांनी केले आहे. आपण सगळ्यांनीच यासंबंधात विचार करून सुयोग्य पावले उचलण्याची गरज आहे.

**काही भारतीयांना स्वत:च्या भारतीय भाषाच येत नाहीत या वास्तवाकडे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी नुकतेच एका कार्यक्रमात लक्ष वेधले. इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेण्याला विरोध नाही हे स्पष्ट करतानाच घरी सुद्धा भारतीय भाषा बोलली जात नाही ही परिस्थिती वाईट आहे असे त्यांनी म्हटले. आणि ते खरेच आहे. 'मम्मी राइस नको' अशा तऱ्हेची भाषा मुले घरी बोलतात याचा डॉ. भागवत यांनी उल्लेख केला. हे नक्कीच आज आपल्याकडे अनेक शहरी घरांमधील वास्तव आहे. बहुतेकदा घरी मातृभाषेतून बोलतानाही त्यात इंग्रजी भाषेचे मिश्रण असते. एक काळ असा होता जेव्हा आपल्याकडे संपूर्ण संवाद, ज्ञानविनिमय आणि दैनंदिन व्यवहार संस्कृतमध्ये होत होते. आज अनेक मुलांना काही मूलभूत आणि सोपे शब्दही माहीत नाहीत याकडेही डॉ. भागवत यांनी लक्ष वेधले. ज्ञानेश्वरीच्या इंग्रजी भाषांतरित ग्रंथाचे प्रकाशन नागपूर येथील एका कार्यक्रमात सरसंघचालकांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबत महायुती सरकार आग्रही आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉ. भागवत यांची भारतीय भाषाविषयक विधाने महत्त्वाची मानली जात आहेत. पूर्वीची व्यवहार भाषा संस्कृत होती. मात्र आज आपल्याला संस्कृत शिकवायला अमेरिकेतील प्राध्यापक येतात. मुळात आपण त्यांना जे शिकवायला हवे ते आपल्याला शिकवतात या विरोधाभासाकडेही डॉ. भागवत यांनी लक्ष वेधले. आपल्या येणाऱ्या पिढीला आपल्या भाषा कोण शिकवणार अशी चिंता त्यांनी व्यक्त केली असून ती रास्तच म्हटली पाहिजे. या स्थितीला इंग्रजी माध्यमातील शिक्षण जबाबदार नाही. किमान घरी तरी भारतीय भाषेत बोलण्याची इच्छा देखील अनेकांच्या ठायी नसते. सर्व भारतीयांनी किमान स्वत:च्या घरी आग्रहाने आणि कटाक्षाने नीट स्वत:च्या भाषेत बोलायला हवे आहे. पण आपण तसे करत नाही. डॉ. भागवत यांनी यावेळी ज्ञानेश्वरांचा उल्लेख करीत सांगितले की समाजाला समजण्यास सोपे जावे म्हणून ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेचे ज्ञान मराठीत आणले. भारतीय भाषांमध्ये जे विचार आहेत ते इंग्रजीत नेमकेपणाने व्यक्त करणारे शब्द अनेकदा आढळत नाहीत. ज्ञानेश्वरांनी वापरलेला एक मराठी शब्द समजावण्यासाठी इंग्रजीतील अनेक शब्द लागतात. तरीही त्या शब्दाचा अर्थ पूर्णपणे कळेल असे वाटत नाही. कल्पवृक्षाचा इंग्रजीत अनुवाद कसा करणार असा प्रश्न सरसंघचालकांनी यावेळी केला. अशा संकल्पनांचे भाषांतर करणे कठीण असल्याने भारतीय भाषा जपणे व मजबूत करणे आवश्यक आहे असे मत डॉ. भागवत यांनी व्यक्त केले आहे. भारतीय भाषांमध्ये आपल्या संस्कृतीचा अनमोल ठेवा आहे. जागतिक वारसा गणले जावे असे थोर भारतीय तत्त्वज्ञान हे भारतीय भाषांमधून समजून घेतले तरच अधिक उत्तम प्रकारे समजू शकणार आहे. त्यामुळेच भारतीय भाषा जपण्या–जोपासण्यासाठी आपण सगळ्यांनी योगदान देण्याची खरोखरीच गरज आहे.**

# आंबट चिंबट हिवाळी रानफळांना बहर!





नुकताच हिवाळा सुरू झाला आहे. हिवाळी दिवसांत रानावनात होणाऱ्या रान फळांना बहर येण्यास सुरूवात झाली आहे. हिवाळा सुरू झाला की सर्वांना वेध लागतात ते गुलाबी थंडीचे आणि या थंडीच्या दिवसात खायला मिळणाऱ्या विविध रान फळांचे.नुकतीच थंडीला सुरुवात झाली असून खास हिवाळ्यातील रानफळांचे आगमन सुरू झाले आहे. उन्हाळ्यात ज्याप्रमाणे रानावनात आंबे,जांभूळ,काजू इत्यादी रानफळे खावयास मिळतात तसेच खास हिवाळी दिवसातही विविध प्रकारच्या रानफळांना बहर येत असतो. यामध्ये बोंडे,आवळा,बोरे,चिंच इत्यादी फळांचा समावेश होतो. चवीला गोड नसणारी आंबट,तुरट वर्गात मोडणारी ही फळे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चवीमुळे सर्वांसाठी खास आकर्षणाचा भाग आहेत. पावसाळा संपल्यानंतर सुरू होणाऱ्या थंडीच्या मोसमातील पौष्टिक व आरोग्यवर्धक फळे म्हणून ही फळे प्रसिद्ध आहेत. पावसाळ्यानंतरच्या वाढणाऱ्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर व थंडीच्या मोसमात ही फळे तयार होतात.

आवळा,बोरे,चिंच ही आंबट चवीसाठी प्रसिद्ध असून खास हिवाळ्यात तयार होणारी बोंडे ही तुरट – राकट चवीसाठी प्रसिद्ध आहेत.हिवाळ्यातील थंडीचे हे दिवस रान बोरांसाठी प्रसिद्ध आहेत. काटेरी अशा बोरीच्या झाडांवर आढळणारी बोरे पक्व होण्यास सुरुवात झाली असून बाजारात पाच ते दहा रुपयांना पुरचुंडीमध्ये ती विकली जात आहेत. कोकणातील रानावणात होणारी ही बोरे खास वाळवून मीठ लावून उन्हाळी दिवसांसाठीही ठेवली जातात.यात बी मध्ये असणारे गरही खास खाण्यासाठी चविष्ट असतात. लहान मुले आवर्जून हे गर फोडून खातात. खाडी पट्ट्यातील टपोऱ्या बोरांचे खवय्यांना खास आकर्षण असते. बोरा प्रमाणेच या दिवसात आंबट– चिंबट अशा चिंचांचा मोसम सुरू झाला आहे आकडेवाल्या, लांबसडक चिंचांनी चिंचेची झाडे लगडलेली दिसून येत आहेत.याच दिवसातील चिंचांचा स्वाद घेणे, मिठासोबत खाणे अनेक जण पसंत करतात. पूर्ण परिपक्व झालेल्या चिंचांचा मोसम सुरू होत असून खवय्यांना आंबट चव देणाऱ्या चिंचांची बोंडूके भुरळ घालत आहेत. चिंचेचा कोळ तयार करणे चिंचोके तयार करणे इत्यादी कामे या दिवसात घरोघरी केली जातात. या उद्योगातून अनेक कुटुंबांना अर्थाजनही प्राप्त होत असते. दहा ते पंधरा रुपये वाटा याप्रमाणे या चिंचा विकल्या जात आहेत. बोरी चिंचाप्रमाणे बाजारात आवळा उपलब्ध झाली आहेत. भरपूर प्रमाणात '' जीवनसत्व देणारी आवळे शंभर ते दीडशे रुपये किलो प्रमाणे विकले जात आहेत. आवळ्याचा पेठा,लोणचं, चवनप्राश इत्यादी बनविण्याकडे गृहिणींनी पसंत दिली आहे. हिवाळी दिवसात रानात मिळणारे व सर्वांच्या पसंतीस उतरणारेरणारे फळ म्हणजे बोंडे होत. बोंडीच्या झाडावर हिवाळी दिवसात होणारे हे फळ खायला तुरट – राकट असते. मात्र उन्हामध्ये पूर्ण वाळवल्यानंतर याच्यामध्ये येणारा गोडवा अवर्णनीय असतो. आदिवासी बांधवांना या फळांच्या मळा तयार करून चांगले अर्थाजनही मिळते. या फळाप्रमाणेच रानावनात या दिवसात आमटीची फळे काळेटीची फळे इत्यादी फळे तयार झाली असून खास रानमेवा म्हणून ती प्रसिद्ध आहेत.जंगलातील वनवे आणि वृक्षतोड यामुळे या रानमेवांच्या झाडांची संख्या कमी होत असली तरी या रान फळांचा गोडवा आणि चव खवय्यांच्या जिभेवर कायम रेंगाळत असते. अशा या खास दिवाळी दिवसातील रानफळांची सध्या सर्वत्र चर्चा असून या रानफळांना चांगली मागणी आहे.ही फळे खास क जीवनसत्व देणारी असून थंडीच्या दिवसांत उत्तम आरोग्यासाठी ही फळे खाणे आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात.

तुळशी विवाह नंतर ही रान फळे विक्रीसाठी आली असून या फळांना चांगली मागणी आहे. परंपरे नुसार तुळशी विवाह नंतर ही फळे खाण्यास परिपक्व समजली जातात .

हिवाळ्यातील रानफळे तयार झाली असून खास रानमेवा म्हणून ती प्रसिद्ध आहेत. जंगलातील वनवे आणि वृक्षतोड यामुळे या रानमेवांच्या झाडांची संख्या कमी होत असली तरी या रान फळांचा गोडवा आणि चव खवय्यांच्या जिभेवर कायम रेंगाळत असते. खास आंबट चवीसाठी ही फळे प्रसिद्ध आहेत.

**–प्रदीप लांगी,** निसर्गप्रेमी

# कालजंत्रीकार आणि आद्य विज्ञान प्रसारक बाळाजी मोडक

कालजंत्रीकार आणि विज्ञान प्रसारक बाळाजी प्रभाकर मोडक यांचा आज स्मृतिदिन. त्यांचा जन्म २२ मार्च, १८४७ रोजी दक्षिण कोकणातील आचरे येथे झाला. त्यांचे शिक्षण सांगली, बेळगाव व पुण्याच्या डेक्कन कॉलेजात झाले. सांगलीत दादा छापखाने या शिक्षकांमुळे त्यांना गणिताची गोडी लागून त्यांच्या पुढील विज्ञान शिक्षणाचा पाया घातला गेला.

प्रथम ते राजाराम हायस्कूल, कोल्हापूर येथे सहाय्यक शिक्षक, तर लगेच एका वर्षामध्ये राजाराम कॉलेजमध्ये भौतिकशास्त्राचे प्राध्यापक झाले. त्यांनी मुंबई इलाख्याच्या गॅझेटमधील कोल्हापूर विषयक खंडाचे मराठी भाषांतर केले. डॉ. सेठना व डॉ. के. आर. कीर्तिकर यांच्या मदतीने त्यांनी कोल्हापूरच्या शिक्षण खात्यात सुधारणा सुचविणारा अहवाल तयार केला. मोडकांच्या शिफारसीने कोल्हापूरात औद्योगिक वस्तुसंग्रहालयाची स्थापना झाली. कोल्हापूरातील नेटिव्ह जनरल लायब्ररीच्या (आताचे करवीर नगर वाचन मंदिर) विकासात व सदर्न मराठा बेन्केच्या पुनरुज्जीवनात मोडकांचा सिंहाचा वाटा होता.



मोडकांनी इतिहास, भूगोल, विज्ञान, बँकिंग इत्यादी विषयांवर सुमारे ४३ (३८ प्रकाशित व ५ अप्रकाशित) मराठी पुस्तके लिहिली व भाषांतरीत केली.

राजाराम हायस्कूलमधून एका शैक्षणिक प्रकल्पासाठी, पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सॅम्युअल कुक यांच्याकडे, रसायनशास्त्राचे सैद्धान्तिक व प्रात्यक्षिक शिक्षण घेतल्यावर, मोडकांनी दिलेल्या जाहीर सप्रयोग व्याख्यान मालेतून त्यांचे पहिले वैज्ञानिक पुस्तक रसायनशास्त्र – पूर्वार्ध प्रसिद्ध झाले. चित्र, प्रयोग आणि दैनंदिन घटनांद्वारे वैज्ञानिक सिद्धांत समजावणाऱ्या, सोप्या भाषेतील मोडकांच्या पुस्तकाचे, विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी व विविध ज्ञानविस्तारकार भाईसाहेब गुप्त्यांनी कौतुक केले. भावी काळात विज्ञान शिक्षण मराठीतून सुरू झाल्यास, पाठयपुस्तके उपलब्ध असावीत, म्हणून मोडकांनी विज्ञानावर २६ पुस्तके मराठीत लिहिली. यंत्रशास्त्र, निरिंद्रीय व सेंद्रीय रसायनशास्त्र, शेतकी, प्राणीशास्त्र, खनिज, वनस्पतीजन्य व प्राणीजन्य पदार्थ, आरोग्यशास्त्र, उष्णता, विद्युत, चुंबकत्त्व, ध्वनी व प्रकाश इत्यादी विज्ञानशाखांमधील अत्याधुनिक संशोधन मराठीत आणणारे मोडक पहिलेच लेखक होत. भारतीय रंग व्यवसायाच्या पुनरुज्जीवनासाठी मोडकांनी शिल्पकलाविज्ञान या मासिकांत आधुनिक पाश्चिमात्य रंगनिर्मिती व तंत्रज्ञानाविषयी लेख लिहिले. (साभार : मराठी विश्वकोष)



## बदलते तंत्रज्ञान

# रेल्वे तिकिटावरील चुकीचे नाव, तारीख अशी करा दुरूस्त

ट्रेनने प्रवास म्हटलं की, सगळ्यात आधी ट्रेनचे तिकीट बुक करावे लागते तसेच ट्रेनचे तिकीट बुक करताना चुका होणे सामान्य बाब आहे. विशेषत: जेव्हा आपण ही गोष्ट घाईघाईत करतो. जर तुम्ही चुकीच्या तारखेसाठी रेल्वे तिकीट आरक्षित केले असेल, तर तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही, कारण तुम्ही ते रद्द न करता, तुमची चूक सुधारू शकता. म्हणजेच भारतीय रेल्वे प्रवाशांना त्यांच्या तारखेत बदल करण्याची किंवा गरज भासल्यास तिकीट दुसऱ्याला हस्तांतरित करण्याची परवानगी देते. तुम्ही या सुविधेचा लाभ कसा घेऊ शकता आणि आवश्यक बदल कसा करू शकता हे जाणून घेऊ



कन्फर्म तिकिटावरील प्रवासाची तारीख बदला. कुटुंबातील जवळच्या सदस्याला तिकिटे हस्तांतरित करा. शाळा किंवा प्रवासी गटांसाठी सामूहिक तिकिटे मॉडिफाय करा, पण ही गोष्ट लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, या सेवा विशिष्ट नियमांसह येतात आणि केवळ विशिष्ट परिस्थितीत लागू होतात.

**ऑफलाईन बुकिंग :** फक्त रेल्वे आरक्षण काउंटरवर बुक केलेल्या तिकिटांसाठी तारीख किंवा नावात बदल करण्याची परवानगी आहे.

**ऑनलाईन बुकिंग :** आयआरसीटीसी वेबसाईट किंवा पद्वारे बुक केलेल्या तिकिटांमध्ये बदल करता येत नाहीत.रेल्वे तिकीट हस्तांतरणाही परवानगी देते, पण ही सेवा कुटुंबातील जवळच्या सदस्यांपुरती मर्यादित आहे. जसे की पालक, भावंड, मुले किंवा जोडीदार. तर शैक्षणिक सहलींसाठी बुक केलेल्या ग्रुप तिकिटांसाठी, योग्य कागदपत्रांसह ग्रुप सदस्यांमध्ये हस्तांतर केले जाऊ शकते.

तिकिटावरील नाव व तारीख बदलण्यासाठी सोप्या स्टेप्स

तुमच्या जवळच्या रेल्वेस्थानकाला भेट द्या, नाव बदलण्यासाठी, प्रवासाच्या किमान २४ तास अगोदर रेल्वेस्थानकावर जा, तारीख बदलण्यासाठी ४८ तास अगोदर रेल्वेस्थानकावर जा.

**आवश्यक कागदपत्रे जमा करा**

लेखी अर्जासोबत मूळ तिकीट बरोबर ठेवा. फेरबदल शुल्क भरा. तिकीट बदलांवर प्रक्रिया करण्यास शुल्क आकारले जाईल.तेव्हा चुकीच्या तारखेला किंवा चुकीच्या नावाखाली बुकिंग करण्यासारख्या चुकांमुळे आता ताण घेण्याची गरज नाही. या सोप्या पायऱ्यांसह तुम्ही तुमचे आरक्षण सहजपणे बदलून तुमचा प्रवास करू शकता.

# मराठी साहित्यिक अनंत काणेकर

नारायण आधुनिक मराठी कवी, चतुरस्त्र लेखक व वृत्तपत्रकार अनंत काणेकर यांची आज जयंती. त्यांचा जन्म २ डिसेंबर १९०५ रोजी मुंबई येथे झाला. शिक्षण बीएएलएलबी झाल्यावर हायकोर्टाची वकिलीची सनदही त्यांनी मिळविली. मुंबईतील नाट्यमन्वंतर (१९३३) या प्रयोगशील नाट्यसंस्थेचे एक संस्थापक. १९३५ ते १९३९ या काळात मुंबईच्या चित्रा या साप्ताहिकाचे ते संपादक होते. १९४१ ते १९४६पर्यंत मुंबईच्या खालसा महाविद्यालयात ते मराठीचे प्राध्यापक होते. त्यानंतर मुंबईच्याच सिद्धार्थ महाविद्यालयात ते विभागप्रमुख होते.

चांदरात व इतर कविता (१९३३) हा त्यांचा एकमेव काव्यसंग्रह. तत्कालीन काव्यसंकेतांना टाळून लिहिलेल्या त्यांच्या कवितांत प्रादेशिक लोकगीतांचे, विडंबन काव्याचे, पुरोगामी सामाजिक आशयाचे आणि प्रेमभावनेच्या प्रसन्न आविष्काराचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन घडते. नाटयमन्वंतर या संस्थेमुळे काहीशा संक्रमणकालातील प्रयोगशील मराठी रंगभूमीशी त्यांचा संबंध आला. निशिकांतची नवरी (१९३८), घरकुल (१९४१) व फास (१९४९) ही त्यांची रुपांतरित नाटके प्रयोगशील रंगभूमीला उपकारक ठरली. धूर व इतर एकांकिका (१९४१) त्यांच्या आहेत.



**निमित्त**

पिकली पाने (१९३४) हा काणेकरांचा पहिला लघुनिबंधसंग्रह होय. १९२५पासून मराठीत अवतरलेला हा नवीन गद्य साहित्यप्रकार सुस्थिर व संपन्न करण्याचे कार्य फडके–खांडेकरांबरोबरच काणेकरांनीही केले. गणूकाका हे त्यांच्या लघुनिबंधातील कल्पित पात्र पुराणवादी वादप्रियतेने संस्मरणीय झाले आहे. रुढ संकेतांना धक्के देणारी चतुर वैचारिकता, नाट्यपूर्ण शैली व आटोपशीरपणा हे त्यांच्या लघुनिबंधांचे विशेष गुण आहेत. शिंपले आणि मोती (१९३६), तुटलेले तारे (१९३८), उघड्या खिडक्या (१९४५) व विजेची वेल (१९५६) हे त्यांचे अन्य लघुनिबंधसंग्रह होत.

धुक्यातून लालताऱ्याकडे! (१९४०), आमची माती आमचे आकाश (१९५०), निळे डोंगर तांबडी माती (१९५७), रक्ताची फुले (१९५९) खडक कोरतात आकाश (१९६४), सोनेरी उन्हात पाचूची बेटे आणि गुलाबी प्रकाशत बोलक्या लेखण्या (१९६९) ही त्यांची प्रवासवर्णनपर पुस्तके होत. मराठीतील प्रवासवर्णनांना काणेकरांनी वाङ्मयीन दर्जा प्राप्त करुन दिला. स्थलचित्रे, निसर्गचित्रे, व्यक्तिरेखा, प्रसंगचित्रे व समाजचित्रण यांनी संपन्न असलेल्या त्यांच्या प्रवासवर्णनांत त्यांच्या रसिक व बहुश्रुत व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब उमटलेले आहे.

काणेकरांनी कथालेखनही केले आहे. जागत्या छाया (१९३६), मोरपिसे (१९४०), दिव्यावरती अंधेर (१९४०) व काळी मेहुणी (१९४२) हे त्यांचे कथासंग्रह. मानवी स्वभावातील वैचित्र्याचे वास्तव दर्शन त्यांच्या कथांतून घडते. रुपेरी वाळूमधील (१९४७) रुपककथा नावीन्यपूर्ण व परिणामकारक आहेत. औरंगाबादच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे (१९५७) ते अध्यक्ष होते. १९५८पासून ते साहित्य अकादमी व संगीत नाटक अकादमीचे सदस्य आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचेही ते सदस्य आहेत. १९६५ साली पद्मश्री होण्याचा बहुमान त्यांना प्राप्त झाला. १९७१मध्ये सोव्हिएट देश नेहरु पारितोषिकाचे मानकरी ठरले. **(साभार : मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# मखाणा खाण्याचे अप्रतिम फायदे खूप; जाणून घ्या..

मखाणा हे पोषक तत्वांचे भांडार मानले जाते. कारण यामध्ये प्रथिने, फायबर, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि लोह मोठ्या प्रमाणात असते. रोज मखाणा खाण्याचे आरोग्यदायी फायदे तुम्हाला माहित नसतील तर आज जाणून घेऊया. आरोग्य फायदे आहेत.



मखाणा तुम्ही तर रोज सकाळी रिकाम्या पोटी खाल्ल्यास रक्तदाबासारख्या अनेक समस्या दूर होऊ शकतात. हाडे मजबूत करण्यासाठी मखाणा फायदेशीर मानला जातो. याशिवाय रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्याचे कामदेखील मखाणा करते.

**वजन कमी करण्यासाठी मदत**

तुम्हाला जर तुमचे वजन कमी करायचे असेल तर तुम्ही तुमच्या आहारात मखाणाचा समावेश करु शकता. तुम्हाला वजनावर नियंत्रण ठेवायचे असेल तर रोज सकाळी रिकाम्या पोटी मखणा खावे. यामध्ये फॅट आणि कॅलरीज कमी असतात. या शिवाय फायबर भरपूर असते. त्यामुळे पोट जास्त काळ भरलेले राहण्यास मदत होते. यामुळे भूक लागत नाही.

**हाडे मजबूत बनवते**

मखाणामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम असते. जे हाडे मजबूत करण्याचे काम करते. सकाळी रिकाम्या पोटी मखना खाल्ल्याने हाडांच्या संबधित समस्या दूर होऊ शकतात.

**मखाणा वाढवते रोगप्रतिकारशक्ती**

सकाळी जर तुम्ही रिकाम्या पोटी मखाणा खाल्ला तर तुमची रोगप्रतिकारशक्ती वाढू शकते. मखाणामध्ये भरपूर प्रमाणात अँटीऑक्सिडंट असतात. ज्या रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. शरीराला अनेक प्रकारच्या आजारांपासून वाचवण्याचे काम मखाणा करते.

**रक्तातील साखरेवर नियंत्रण**

सकाळी जर तुम्ही रिकाम्या पोटी मखाणा खालला तर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत होते. मधुमेहाच्या रुग्णांसाठी मखाणा खूप फायदेशीर मानला जातो. मधुमेहींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच मखाणा खावा.

**पचनक्रिया सुधारते**

सकाळी रिकाम्या पोटी जर तुम्ही मखाणा खाल्ला तर तुमची पचनक्रिया देखील चांगली राहते. मखाणामध्ये मुबलक प्रमाणात फायबर आढळते, सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन केल्याने बद्धकोष्ठता, अपचन आणि ॲसिडिटीसारख्या समस्या सहज दूर होतात.

# उमेदवारांचे भवितव्य आज मतदान यंत्रात होणार बंद

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी परिषद सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्यानंतर निवडणूक रणधुमाळी चांगलीच तापल्याचे दिसून आले आहे.निवडणूक प्रक्रियेमध्ये अंतिम टप्प्यातील प्रक्रिया असलेल्या मतदान आज होत असून या मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक प्रशासन यंत्रणा तहसीलदार तथा निवडणूक अधिकारी किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक यंत्रणा सज्ञ झाली आहे.



रोहा अष्टमी नगर परिषदेत आरोप प्रत्यारोपाच्या फेरी होत असताना राजकीय तर्क वितर्क वर्तवले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित पवार गट ) म्हणजेच खा. सुनील तटकरे यांचा बालेकिल्ला रोहा तालुका ओळखला जातो. त्या बालेकिल्ले शिवसेना ( शिंदे गट ) ने आव्हान दिल्यानंतर ही निवडणूक चुरशीची होणार असे बोलले जात असताना त्याच पद्धतीने दोन्ही बाजूने प्रचार यंत्रणा राबवले गेले आहे. त्यामुळे मतदार कोणाच्या बाजूने कौल देतात त्यांचा कौल आज मतपेटीत बंदिस्त होणार आहे.

रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ ब मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( अजित पवार गट) चे राजेंद्र जैन बिनविरोध आल्यानंतर उर्वरित रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या १९ जागेसाठी विविध पक्षाच्या निवडणुकीसाठी उभे असलेल्या उमेदवारांमध्ये शिवसेना ( शिंदे गट ) १३, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित पवार गट ) १९, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टी ५, शिवसेना (उबाठा ) ४, भारतीय जनता पार्टी ३, अपक्ष ६ हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या उमेदवारांचे भवितव्य आज मतपेटीत बंदिस्त होणार आहेत.

रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी १७६६९ मतदार आहेत. यामध्ये ८६४१ पुरुष व ९०२८ महिला मतदार आहेत. या मतदारांच्या हाती रोहा अष्टमी नगर परिषदेच्या निवडणुकीच्या उमेदवारांचे भवितव्य आहे

रोहयात राष्ट्रवादी ( अजित पवार गट) विरुद्ध एकत्रीत शिवसेना ( शिंदे गट ), शिवसेना ( उबाठा ) भाजप असे लढत असून काँग्रेस मात्र स्वतंत्र लढत आहे. थेट नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादीच्या ( अजित पवार गट) वनश्री शेडगे विरुद्ध ( शिवसेना शिंदे गट ) च्या शिल्पा धोत्रे अशी लढत आहे. ही लढत काटे की टक्कर होणार असल्याचे राजकीय वर्तुळातून व्यक्त केले जात आहे.

रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीत मतदानासाठी २० केंद्र तयार करण्यात आले आहेत. निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार किशोर देशमुख, निवडणूक सहाय्यक अधिकारी अजयकुमार एडके, नायब तहसीलदार राजेश थोरे, मोकल, नगरपरिषदेचे निवास पाटील यांच्यासह १४० अधिकारी, कर्मचारी निवडणुकीचे काम पाहत आहेत

पोलीस यंत्रणा सुद्धा सज्ञ झाले असून पोलीस उपविभागीय अधिकारी प्रसाद गोकुळे, पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ९ अधिकारी, ५६ पोलीस अंमलदार, एक पथक (१५ जवान ) व ४० होमगार्ड तैनात करण्याते आले आहेत.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अपघात

## एकाचा मृत्यू; दोन जण जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर काल रात्र एका ट्रेलरने समोरील कारला जोरदार धडक देऊन समोर उभ्या असलेल्या प्रवाशाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातात प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला आहे तर कार मधील दोन प्रवाशी जखमी झाले आहेत,




मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवरून ट्रेलर मुंबईहुन पुण्याकडे जात असताना, खोपोली एक्सिट जवळ आला असता, चालकाचे नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील हुंडाई कार ला पाठीमागून जोरदार धडक देऊन रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या प्रवाशी मनीष पवार (वय ३७ रा खोपोली ) याला जोरदार धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला तर कार मधील दोन जण जखमी झाले आहेत.

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट पोलीस खोपोली पोलीस हेल्प फाउंडेशनचे सदस्य, आयआरबी टीम तात्काळ घटनास्थळी दाखल होत कार मधील अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून पुढील उपचारासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले.

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अलिकडच्या काळात अपघात वाढले आहेत. बेशिस्त वाहनचालकांमुळे इतरांना त्याचा फटका बसत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# नागोठणे येथील प्रधान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय एड्स निर्मूलन दिन साजरा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील को. ए. सो. आनंदीबाई प्रधान महाविद्यालयात आंतराष्ट्रीय एड्स निर्मूलन दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन शिक्षण व विस्तार विभागातर्फे सोमवार दि. १ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



या दिनानिमित्त निबंध स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन व एच. आय. व्ही. एड्स निर्मूलन जनजागृती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी उपजिल्हा रूग्णालय, रोहा येथील एच. आय. व्ही. एड्स निर्मूलन प्रतिबंध विभाग समुपदेशक महेश गोसावी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते तर महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक डॉ. दिनेश भगत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

महेश गोसावी यांनी विद्यार्थ्यांना एच.आय.व्ही. आणि एड्स या दोन शब्दाचा फरक समजावून सांगितला. एड्स होण्याची चार कारणे समजावून सांगितली व थोड्याशा आनंदासाठी उच्च शिक्षण घेतलेले विद्यार्थी याचे कसे शिकार झाल्याचे उदाहरणे सांगितले.

प्राचार्य डॉ. दिनेश भगत यांनी सांगितले की, एड्स निर्मूलन जनजागृती कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्याची खूप गरज आहे. कारण मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थी नको त्या साईट उघडतात व नकळत त्यात आडकत जातात. म्हणून विध्यार्थ्यांनी वेळीच सावध व्हावे असे आवाहन डॉ. दिनेश भगत यांनी केले.

# माणगाव उपनगराध्यक्षपदासाठी राष्ट्रवादीच्या रिया उभारे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेविका रिया रत्नाकर उभारे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज सोमवार दि.१ डिसेंबर रोजी दुपारी नगरपंचायत कार्यालयात अतिरिक्त कार्यभार असलेले माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांच्याकडे नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक आनंद यादव,माजी उपनगराध्यक्ष दिलीप जाधव,रत्नाकर उभारे,नगरसेविका सुशीला वाढवळ,नगरसेविका लक्ष्मी हिलम,नगरसेविका सुविधा खैरे,नगरसेविका रश्मी मुंढे,नगरसेविका ममता थोरे यांनी दाखल केला.



माणगाव नगरपंचायतीच्या माजी उपनगराध्यक्षा हर्षदा सोंडकर - काळे यांनी आपला उपनगराध्यक्ष पदाचा ठरल्याप्रमाणे कार्यकाळ पूर्ण झाल्यावर राजीनामा दिला होता. या रिक्त झालेल्या उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम रायगड जिल्हाधीकारी किशन जावळे यांनी जाहीर केला. त्यानुसार या पदासाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याच्या दिवशी सोमवार दि. १ डिसेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे रिया रत्नाकर उभारे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे.

या अर्जाची छाननी उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड व नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांनी करून हा अर्ज वैध ठरविला आहे. त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाली असून केवळ शिक्कामोर्तब होणे बाकी आहे.

यासाठी नगरपंचायतींच्या नगरसेवक,नगरसेविका यांची विशेष सभा गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वा. या निवडणुकीचे पीठासन अधिकारी माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली असून त्यावेळी या सभेत पीठासन अधिकारी हे रिया रत्नाकर उभारे यांची उपनगराध्यक्ष पदावर निवड झाल्याची औपचारिक घोषणा करतील.

# तळा तालुक्याच्या क्रीडा संकुलामधील गवत काढण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

दुर्गम डोंगराळ तळा तालुक्यासाठी बोरघर हवेली येथे असलेले क्रीडा संकुल खेळाडूंसाठी आधार ठरत असल्याचे पहावयास मिळत आहे. तळा तालुका क्रीडा संकुलाचे लोकार्पण १९ऑगस्ट २०१२ रोजी झाले होते. तालुक्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंना विविध खेळांसाठीचा सराव व मार्गदर्शन व्हावे जेणेकरून ग्रामीण भागातील खेळाडूना संधी मिळून ते खेळाडू राज्य, राष्ट्रीय, जागतिक पातळीवर व ऑलंपिक स्पर्धापर्यत जाण्याच्या दृष्टीने असे हे क्रीडा संकुल तालुका पातळीवर झाले आहे.



या ठिकाणी भालाफेक,थाळी फेक, कबड्डी, बॅडमिंटन,लॉंगटेनिस, बास्केटबॉल,धावणे इत्यादींसाठी क्रीडांगण व साहित्य उपलब्ध आहेत.मात्र येथे क्रीडांगणावर अनेक ठिकाणी सुकलेले गवत मोठ्या प्रमाणात आहे हे गवत काढण्याची मागणी क्रीडाप्रेमीं कडून होताना दिसत आहे.विविध खेळांसाठी तरूण वर्गानी पुढाकार घेऊन खेळांचा नियमित सराव करून खेळांमधील गुणवत्ता प्राप्त करून जिल्हा पातळी ते आंतरराष्ट्रीय पातळी पर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.या क्रीडा संकुलात विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार पावसाळी क्रीडास्पर्धा होतात. एखाद्या क्रीडा मंडळाने पुढाकार घेऊन मार्गदर्शन व खेळांचा सराव तसेच विविध स्पर्धांचे आयोजन केल्यास होतकरू व नवीन खेळाडूंना प्रोत्साहन मिळून चांगल्या दर्जाचे खेळाडू येथे निर्माण होतील अशी अपेक्षा क्रीडाप्रेमींकडून होत आहे.

खो-खो सारख्या खेळात तालुक्यातील वरळ भागातील खेळाडू राज्य पातळीवर गेले आहेत. म्हणुनच भालाफेक मध्येही पुढे गेले आहेत.बोरघरहवेली येथील क्रीडा संकुलात राज्यस्तरीय स्पर्धा व्हाव्यात

# आज नागोठण्यात वीज नाही

**नागोठणे : बातमीदार**

मंगळवार दि. २ डिसेंबर रोजी नागोठणे फिडर च्या मुख्य वीजवाहिनीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी नागोठणे फिडर वर असणाऱ्या सर्व गावांचा वीजपुरवठा सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत पूर्णपणे बंद राहणार असून याची सर्व वीजग्राहकांनी नोंद घ्यावी तसेच कामाच्या सोयीनुसार वेळेत बदल केला जाऊ शकतो अशी माहिती महावितरण कंपनी नागोठणेचे सहा. अभियंता सत्येंद्र सिंह यांनी दिली आहे.

नागोठणे शहर, ऐनघर विभाग, सुकेळी विभाग, आमडोशी , वांगणी विभाग, वाकण , पाटणसई , चिकणी ,वरवठणे, निडी , पळस विभाग, कोंडगाव , वासगाव विभाग, वेलशेत , कडसुरे विभाग आदी गावांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लाईट बंद राहणार आहे.

# संविधान जागर सप्ताह उत्साहात साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**

सविधान जागर अभियान सप्ताह अंतर्गत तेलवडे ग्रामपंचायत येथे आरोग्य विभाग मुरुड , तेलवडे ग्रामपंचायत व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांच्या संयोजनातून आभा कार्ड व आयुष्यमान कार्ड कॅम्प तेलवडे ग्रामपंचायत येथे लावण्यात आला होता .

या कार्यक्रमाचे उद्घाटन संविधान उद्देशिका पत्रिकेचे सामूहिक वाचन करून करण्यात आले. संविधान उद्देशिका पत्रिका आरोग्य विभागात भेट देण्यात आली. तेलवडे ग्रामपंचायत हद्दीतील लाभार्थ्यांना या कॅम्प अंतर्गत आभा कार्ड व आयुष्यमान कार्ड गावपातलीवर काढून देण्यात आले. तसेच लाभार्थ्यांना आभाकार्ड व आयुष्यमान कार्डचे आरोग्य सेवेच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे हे समजून सांगण्यात आले, तसेच या कार्यक्रमांमध्ये आयुष्यमान कार्ड व आभा कार्डचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

उपस्थित तेलवडे ग्रामपंचायत सरपंच कल्पना पवार, उपसरपंच निलेश तांबडकर, ग्रामपंचायत अधिकारी जयश्री धुमाळ, आरोग्य सेविका दिपाली हजारे, आरोग्य सेवक शुभम पाटील, समतादूत वैशाली खरपडे- पेरवे, कर्मचारी संजीवनी करमरकर, आशा सेविका अमृता म्हात्रे, ऑपरेटर जितेंद्र करमरकर, प्रतीक वर्मा, महिलावर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.




**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

कार्यालय : आयुक्त मुख्यालय, २रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल-४१०२०६. दुरध्वनी क्र. ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id : panvelcorporation@gmail.com

**शहर अभियंता विभाग**
**ई-निविदा सूचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government/State Government/ Government Under Taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/ २५६/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती-क धाकटा खांदा गावातील रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे व पूर्वनिर्मित पावसाळी गटार (Precast Storm Water Drain) बांधणे. | ७,६०,९०,५४१/- |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या 'https://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. /१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : १/१२/२०५

सही/-
अतिरिक्त आयुक्त-।
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.६४६/६६९/२०२५



**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. काशिनाथ बारक्या पाटील** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे विंधणे (५५३३२४)**
(PU-ID : 18656218642), **तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २८/४/अ खाते क. ७१२ | २ | ०.५३.९० पो.ख. ०.०२.२० **एकुण ०.५६.१०** | ९.७५ |

श्री. काशिनाथ बारक्या पाटील यांच्या मालकीच्या असलेल्या वरील एकुण क्षेत्र ०.५६.१० पैकी विक्रीस असलेले क्षेत्र ०.२०.०० गुंठे

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/१२/२०२५

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१



**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. रामचंद्र जनार्दन घरत** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : हरिश्चंद्र पिंपळे (५५३३२६)**
**(PU-ID : 22900514468), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८/२ | १ | १.४१.५० पो.ख. ०.०९.८० **एकुण १.५१.३०** | १३.९५ |
| पैकी श्री. रामचंद्र जनार्दन घरत यांचे नावे असलेले खालील क्षेत्र | | | |
| खाते क्र. ५४६ | | ०.२४.०० पो.ख. ०.०२.२० **एकुण ०.२६.२०** | २.३७ |

श्री. रामचंद्र जनार्दन घरत यांच्या मालकीचे असलेले एकुण क्षेत्र ०.२६.२० गुंठे

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१/१२/२०२५

सही/-
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक-३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

# नवी मुंबईत फ्लेमिंगो परतले

## शहरातील गुलाबी हंगाम पुन्हा झाला सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई आणि नवी मुंबईत हंगामातील पहिले फ्लेमिंगो परत येत असल्याने पक्षीप्रेमी आणि पर्यावरणप्रेमींमध्ये उत्साह वाढत आहे, ज्यामुळे या प्रदेशातील वार्षिक गुलाबी हंगामाचे पुनरागमन झाल्याचे संकेत मिळत आहेत. त्यांचे आगमन थोडे उशिरा झाले आहे, परंतु खाड्या आणि तलावांवरून वाहणाऱ्या सुंदर पक्ष्यांच्या दृश्यामुळे जोरदार स्थलांतराची आशा पुन्हा जागृत झाली आहे.



ठाणे खाडीत सुमारे ३०० मोठे फ्लेमिंगो आधीच नोंदवले गेले आहेत, असे वरिष्ठ पक्षी संशोधक मृगांक प्रभू यांनी सांगितले, तर नेरुळमधील डीपीएस फ्लेमिंगो तलावावर निरीक्षकांना लवकर उड्डाणपूल दिसले आहेत. संख्या अजूनही कमी आहे, परंतु लवकरच मोठे कळप अपेक्षित आहेत, अशी पुष्टी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याचे आरएफओ प्रशांत बहादुरे यांनी केली.

फ्लेमिंगो सिटीच्या गुलाबी महोत्सवाचे अनौपचारिक उद्घाटन त्यांच्या परतीच्या शुभारंभाचे प्रतीक आहे, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी.एन. कुमार यांनी सांगितले, ज्यांनी डीपीएस तलावाला संवर्धन राखीव घोषित करण्याच्या दीर्घकाळापासून प्रलंबित राजपत्र अधिसूचनेला अंतिम रूप देण्याचे आवाहन राज्य सरकारला केले.

राज्य वन्यजीव मंडळाने एप्रिलमध्ये पर्यावरण गटांच्या सततच्या मोहिमेनंतर आणि राज्य वनमंत्री गणेश नाईक यांच्या पाठिंब्याने या प्रस्तावाला मंजुरी दिली. पर्यावरणतज्ज्ञांचे म्हणणे आहे की, पक्ष्यांच्या आगमनामुळे मुंबईतील कमी होत चाललेल्या पाणथळ जागांचे संरक्षण करण्याची तातडीची गरज अधिक बळकट होते. नवी मुंबई पर्यावरण संरक्षण संस्थेचे संदीप सरीन यांनी नागरिकांना त्यांच्या अधिवासाचे अधिक मजबूत संरक्षण करण्याची मागणी करताना गुलाबी पाहुण्यांचे मनापासून स्वागत करण्याचे आवाहन केले.

कुमार यांनी भर दिला की उरणमधील पाणजे, भेंडखळ आणि बेलपाडा यासारख्या महत्त्वाच्या पाणथळ जागांसह नवी मुंबईतील एनआरआय, टीएस चाणक्य आणि लोटस लेक यांना विलंब न करता सूचित केले पाहिजे.

अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन सेंटरने तयार केलेल्या इस्रो-समर्थित पाणथळ जागांच्या ॲटलसच्या राष्ट्रीय पाणथळ जागांची यादी महाराष्ट्रात २४,०००मध्ये समाविष्ट केली आहे.

राष्ट्रीय स्तरावर, २.२५ हेक्टरपेक्षा मोठ्या दोन लाखांहून अधिक पाणथळ जागांची यादी आहे, परंतु जमिनीच्या सत्यतेमुळे औपचारिक सूचना मागे पडल्या आहेत. राष्ट्रीय शाश्वत किनारी व्यवस्थापन केंद्राने आयोजित केलेली पडताळणी आता पूर्ण झाली आहे, ज्यामुळे एक मोठा प्रक्रियात्मक अडथळा दूर झाला आहे.

पर्यावरणतज्ज्ञांचे म्हणणे आहे की गुलाबी रंगाचे आगमन हे केवळ हंगामी देखावा नाही तर मुंबईच्या धोक्यात असलेल्या चिखलाच्या फ्लॅट्स आणि खाड्या जिवंत ठेवण्यासाठी आवश्यक भागीदार आहेत.

### पाणथळ जमिनीसाठी महत्त्वपूर्ण योगदान

तज्ज्ञांच्या मते, फ्लेमिंगो पाणथळ जमिनीच्या आरोग्यात महत्त्वपूर्ण योगदान देतात. शैवाल, प्लँक्टन आणि लहान अपृष्ठवंशी प्राण्यांना खाऊन ते पोषक पातळी नियंत्रित करतात आणि शैवाल फुलण्यापासून रोखतात. चिखलाच्या फ्लॅट्सना सतत हलवल्याने वायुवीजन सुधारते, ज्यामुळे जलचर वनस्पती आणि माशांना फायदा होतो, तर त्यांची उपस्थिती पर्यावरणीय स्थिरतेचे विश्वसनीय सूचक म्हणून काम करते.

# पनवेल, खारघर, कामोठे, कळंबोलीत रस्ते दुरूस्तीच्या कामांना प्राधान्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या खारघर, कामोठे, पनवेल, कळंबोली अशा सर्व प्रभागातील रस्ते दुरूस्तीच्या कामांना प्राधान्य देऊन, युध्दपपातळीवरती रस्ते दुरूस्तीची कामे सुरू आहेत. रस्ते दुरूस्तीच्या कामांमुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या आदेशानूसार चारही प्रभागातील रस्ते दुरूस्तीच्या कामांवर बांधकाम विभागाने लक्ष केंद्रीत केले आहे.

नागरिकांची गैरसोय होऊ नये, महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने व्हावी यासाठी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे स्वतः विविध ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन कामाची पाहाणी करून संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देत आहेत.



शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागामध्ये कनिष्ठ अभियंत्याच्या देखरेखीखाली रात्रंदिवस रस्ते दुरूस्तीची कामे केली जात आहे. सध्या कळंबोलीमध्ये सेक्टर १७, सेक्टर १, रोडपाली, खारघरमध्ये बेलपाडा हायवे , सेक्टर १२मध्ये ग्रीन फिंगर शाळा, कामोठ्यामध्ये सेक्टर १२ मध्ये, मानसरोवर स्टेशन मेन रोड, सेक्टर ३, नवीन पनवेलमध्ये शिवा कॉम्लेक्स अशा विविध ठिकाणी रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने सुरू आहेत.



**उरण : जासई येथील अविनाश आत्माराम पाटील यांचे नुकतेच निधन झाले. या पार्श्वभूमीवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले. या वेळी कामगार नेते सुरेश पाटील, लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, डी.पी. सोनवणे, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष विशाल म्हात्रे, अमृत ठाकूर, राजन घरत यांच्यासह कै. अविनाश पाटील यांचे कुटुंबीय उपस्थित होते.**

# एफ.जी. नाईक महाविद्यालयाची एड्स दिनानिमित्त रॅली

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण संस्थेच्या कोपरखैरणे येथील एफ. जी. नाईक महाविद्यालयात १ डिसेंबर, २०२५ रोजी जागतिक एड्स जनजागृती दिन साजरा करण्यात आला. या दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या माध्यमातून पोस्टर मेकिंग आणि जनजागृती रॅलीचे आयोजन एफ जी नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य श्री प्रताप महाडिक यांच्या मार्गदर्शनांतर्गत करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला जिल्हा एड्स नियंत्रण विभाग ठाणे संस्थेअंतर्गत नागरी आरोग्य केंद्र, कोपरखैरणे येथील रमा शिंदे (समुपदेशक), जब्बार शेख (प्रयोगशाळा तंत्रज्ञ), वाहतूक पोलिस निरीक्षक कोपरखैरणे ,पी. एस.आई. प्रकाश देशमुख तसेच महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके, उपस्थित होते.

महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके यांनी देशातील एकूणच एड्स रुग्णाची टक्केवारी नमूद केली व समाजामध्ये एड्स बद्दल असलेले अज्ञान दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांनी जनजागृती व्यापक स्वरुपात करण्याचे आवाहन केले.

रमा शिंदे यांनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत आपल्या जीवनात आरोग्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. वाहतूक पोलिस निरीक्षक कोपरखैरणे, पी.एस. आई. प्रकाश देशमुख ह्यांनी विद्यार्थ्यांनी जबाबदारी घेऊन समाजामध्ये एड्स सारख्या रोगाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन करीत निरोगी समाज घडविणे गरजेचे असल्याचे सांगितले. महाविद्यालयातील पोस्टर मेकिंग स्पर्धेत एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. सूत्रसंचलन समिधा संजोग पाटील ह्यांनी केले.

महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके, राष्ट्रीय सेवा योजना युनिटचे प्रमुख प्रा. समिधा संजोग पाटील आणि प्रा. प्रमोद साळुंखे, एन.एस.एस युनिट सदस्य प्रा. स्वाती होळकर व प्रा. जानवी खारकर आणि इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी विशेष सहकार्य केले.

# जागतिक एड्स दिनानिमित्त विविध कार्यक्रमांतून जनजागृती

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक एड्स दिनानिमित्त श्री समर्थ सामाजिक संस्थेंतर्गत जनजागृती कार्यक्रम रसायनी पाताळगंगा परिसरात पार पडले. यानिमित्ताने विद्यार्थी पदरॅली व परिसरातील शाळांमधील इयत्ता आठवी ते बारावीमधील किशोरवयीन विद्यार्थ्यांना व्याख्यानामार्फत एड्सबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. दरवर्षी परिसरातील गावांत पथनाट्य या माध्यममाद्वारे जागृती करण्यात आली. पथनाट्यातून जास्तीत जास्त किशोरवयींन मुलांना जागृत करण्याचा संस्थेचा मानस आहे.



आज डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय वाशिवली येथील जूनियर कॉलेज च्या विद्यार्थ्यांची पदरॅली काढण्यात आली. विद्यार्थ्यांना एड्स आजाराबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी किशोर वयीन होणारे शारीरिक, मानसिक बदल यावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधुन एड्स आजारा बद्दलची संपूर्ण माहिती देऊन त्यांच्या मनातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. तसेच परिसरातील इतर शाळांमध्ये जागतिक एड्स दिन २०२५ची थीम असमानता समाप्त करा. एड्स संपवा आणि महामारी संपवा, मागे राहिलेल्या लोकांपर्यंत पोहोचण्यावर विशेष लक्ष केंद्रित करून.


या वर्षीचा मुख्य अजेंडा जगभरातील आवश्यक क्खत सेवांमध्ये वाढती असमानता अधोरेखित करणे हा आहे. मानवी हक्कांबद्दलची विभागणी, असमानता आणि दुर्लक्ष हे अशा अपयशांपैकी एक आहेत ज्यामुळे एचआयव्ही हे जागतिक आरोग्य संकट बनू शकले. ज्यामुळे क्खत सह जगणाऱ्या अनेक लोकांचे जीवन अधिक आव्हानात्मक बनले आहे. यावर्षी, WHO आणि AIDS संघटना जागतिक नेत्यांना आणि नागरिकांना एड्सला कारणीभूत असणाऱ्या असमानतेचा सामना करण्यासाठी आणि ज्यांना सध्या आवश्यक क्खत सेवा मिळत नाहीत अशा लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी जनजागृतीचे आवाहन केले आहे.

जागतिक एड्स दिनाच्या या कार्यक्रमास प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप येथील मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. मंगेश देशमुख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्याच बरोबर बिर्ला कार्बन इंडिया कंपनीचे अधिकारी हरीश रावत, लक्ष्मण मोरे,डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय येथील प्राचार्य डॉ. अनिल पाटील, सर्व शिक्षक वर्ग, श्री समर्थ संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील, काशिनाथ खुडे, स्वप्नील घरत आदी उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमास बिर्ला कार्बन इंडिया लिमिटेड यांच मोलाचे सहकार्य मिळाल्याचे अरविंद पाटील यांनी सांगितले.

# मालमत्ता कर तत्काळ भरण्याचे नवी मुंबई पालिकेकडून आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका मालमत्ताकर विभागाकडून थकबाकीदारांविरुद्ध जप्तीपूर्व नोटीस बजावण्यास सुरुवात झाली आहे. एकूण थकबाकीदारांपैकी आतापर्यंत ६४५ नागरिकांना ७ दिवसांची जप्तीपूर्व नोटीस बजावण्यात आली आहे. तर २१८ नागरिकांना ४८ तासांची जप्तीपूर्व नोटीस बजावण्यात आली आहे. थकबाकीदारांनी तातडीने कर न भरल्यास पुढील टप्प्यात महानगरपालिकेकडून प्रत्यक्ष जप्ती कारवाईला सुरुवात करण्यात येणार आहे.



मालमत्ताकर हा महानगरपालिकेच्या महसूलाचा सर्वात महत्वाचा स्त्रोत असून यातूनच नागरिकांना विविध सेवा सुविधांची पूर्तता केली जाते. त्यामुळे कर भरण्याबाबत सातत्य नसल्यास त्याचा शहरातील विकासकामांवर परिणाम होतो. त्या अनुषंगाने थकबाकीदारांना दिलेली जप्तीपूर्व नोटीस ही नागरिकांना दिलेली अंतिम सूचना आहे. जप्तीसारख्या कठोर कारवाया टाळण्यासाठी नागरिकांनी वेळेत करभरणा करावी, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कैलास शिंदे यांचेमार्फत करण्यात आलेले आहे.

नागरिकांना करभरणा करण्यासाठी कोणत्याही महानगरपालिका कार्यालयात जावे न लागता घरबसल्या ऑनलाईन सुविधा उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने मालमत्ताकर विभागाने सर्व डिजिटल पेमेंट पद्धती उपलब्ध करून दिल्या असून त्याचा प्रचार आणि प्रसार प्रभावीपणे केला आहे. व्हॉट्सॲप चॅटबॉट (८२९१९२०५०४), चू छ्वचउ (माझी नवी मुंबई ) ॲप, प्रत्येक महानगरपालिकेची अधिकृत वेबसाईट, तसेच प्रत्येक कर देयकावरील क्यूआर कोड स्कॅनींग त्याचप्रमाणे फोन पे, जीपे अशा विविध युपीआय माध्यमांद्वारे पेमेंट करण्याच्या ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तरी मालमत्ताकर धारकांनी याचा लाभ घेऊन त्वरित करभरणा करावी आणि कटू कारवाई टाळावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## लोकशाही दिन ५ जानेवारीला

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या वेळी प्राप्त अर्जाबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी मालमत्ता कर विभागाला कार्यवाहीचे आदेश दिले.

माहे जानेवारी महिन्याचा लोकशाही दिन ५ जानेवारी २०२६ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि. २२ डिसेंबर २०२५पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळाच्या मुख्यपृष्ठावर जलद दुवे आयकॉनवर उपलब्ध असून ती अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से.१५ ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे.

# फार्मर कप प्रशिक्षण शिबिराला उरणमधील शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील ग्रामपंचायतीच्या सभागृहात कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २९) आयोजित करण्यात आलेल्या 'सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेला उरण तालुक्यातील शेतकऱ्यांचा प्रतिसाद लाभला.



एकत्रित गट शेतीमुळे संसाधनांचा प्रभावी वापर करणे, मोठी बाजारपेठ मिळवणे आणि उत्पादन खर्च कमी करणे यांसारखे फायदे होत असतात. या संदर्भात प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.

पाणी फाउंडेशनचे मार्गदर्शक आशिष लाड व भक्ती कुटे यांनी 'फार्मर कप' स्पर्धेचे नियम, विविध टप्पे आणि शेती व्यवस्थापनातील नव्या पद्धती याबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रस्तावना तालुका कृषी अधिकारी ऋतुजा नारनवर यांनी केली. २०२६ च्या खरीप हंगामापासून सुरू होणाऱ्या 'सत्यमेव जयते फार्मर कप' स्पर्धेत शेतकऱ्यांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहनही केले. उरण फार्मर प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष प्रफुल्ल खारपाटील यांच्यासह अनेक प्रगतशील शेतकऱ्यांनी प्रशिक्षणामुळे शेतीला नवी दिशा मिळाल्याचे मत व्यक्त केले.

कृषी मंडळ कृषी अधिकारी शुभम गटकळ, उपकृषी अधिकारी शिवाजी लोहकरे, उपकृषी अधिकारी अलका बुरकुल, यांच्यासह सहाय्यक कृषी अधिकारी एस. बी. गायकवाड, आर. पी. भजनावळे, एस. जी. घरत, व्ही. डी. चव्हाण, ए. एस. पानसरे, ए. आर. राठोड, डी. लाड तसेच पाणी फाउंडेशनचे अधिकारी उपस्थित होते.

# कळंबोलीच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आजी आजोबा दिन साजरा

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील शामल मोहन पाटील एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल येथे शनिवारी आजी आजोबा दिवस साजरा करण्यात आला.




यानिमित्त शाळेचे संपूर्ण परिसर त्या दिवशी हसरे चेहरे, प्रेमाने ओथंबलेले डोळे आणि भावनांच्या उबदार स्पर्शाने उजळून निघाला.

प्राथमिक आणि पूर्व-प्राथमिक विभागातील लहानग्यांनी आपल्या लाडक्या आजोबा-आजींना खास आमंत्रण देत शाळेत येताना जणू आनंदाचा वर्षाव केला. विद्यार्थ्यांनी आपल्या आजोबा-आजींवर आधारित सादरीकरणांनी सर्वांना भावुक केले. नृत्यातून उलगडणारे त्यांचे जीवन, गीतांतून व्यक्त केलेली त्यांची माया,आणी छोटेखानी नाटिकांमधून दाखवलेले अनुभवांचे धडे प्रत्येक सादरीकरणात वडीलधारे म्हणजे घराचे चिरस्थायी आधारस्तंभ हा संदेश झळकत होता.

न्यू इंग्लिश स्कूलचा ग्रँड पेरेंट्स डे हा केवळ कार्यक्रम नसून, संस्कारांची परंपरा जपणारा एक आवश्यक आणि मनोज्ञ उपक्रम ठरलाया सोहळ्यास मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष सतीश पाटील म्हणाले की, आजोबा-आजींचा सहवास म्हणजे मुलांच्या आयुष्यातील पहिली संस्कारशिदोरी आहे. त्यांच्या अनुभवांची सावली सोबत असेल, तर मुलं नेहमी समृद्ध होतात. त्यांनी वडीलधाऱ्यांचा आदर, त्यांची काळजी आणि त्यांच्या वार्धक्यात त्यांना भावनिक आधार देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास संचालक सनी पाटील, ॲड. रसिका पाटील, जागृती पाटील, मराठी विभाग प्रमुख रोहिणी पाटील, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रँड पेरेंट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात एड्स दिनानिमित्त मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक एड्स दिन व जनजागृती मोहिमेंतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये सोमवारी (दि.१) विद्यार्थ्यांना एड्स रोगा विषयी आणि प्रतिबंधाविषयी विशेष मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले.



याचप्रमाणे विद्यार्थी व विद्यार्थिनींना त्यांच्या विविध शारीरिक समस्यांविषयी उलवे येथील सुप्रसिद्ध ' बोरकर मदर्स केअर ' या रुग्णालयाचे प्रमुख संचालक डॉ.कृष्णा बोरकर व डॉ. मोना बोरकर या डॉक्टर दांपत्याने विशेष मार्गदर्शन केले. त्यांच्यासमवेत डॉ.अपेक्षा आणि अझर उपस्थित होते.

या कार्यक्रमास विद्यालयाच्या पर्यवेक्षिका शशिकला पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, वर्गशिक्षिका गितांजली म्हात्रे, चारुशीला ठाकूर, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे आणि विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

# पारदर्शक कारभारासाठी महायुतीवर विश्वास ठेवा

## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांचे आवाहन; कर्जतमध्ये सभा

**कर्जत : प्रतिनिधी**

महायुतीला संधी दिली तर कर्जतच्या विकासाला गती प्राप्त होईल, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी येथे केले.



कर्जत नगर परिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष-शिवसेना-आरपीआय महायुतीच्या वतीने लोकमान्य टिळक चौकात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष भोईर, किरण ठाकरे, वसंत भोईर, अशोक ओसवाल, दीपक बेहेरे, रमेश मुंढे आदींसह नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. स्वाती लाड आणि नगरसेवक पदाचे उमेदवार व्यासपीठावर उपस्थित होते.

रवींद्र चव्हाण म्हणाले की, माझी कर्जतशी फार मोठी जवळीक आहे. येथे कारभार करण्यासाठी एक उच्च शिक्षित नगराध्यक्ष असावा. महायुतीवर विश्वास ठेवा. केंद्रातील व राज्यातील सरकार खंबीरपणे तुमच्या पाठीशी उभे राहील. यासाठी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. स्वाती लाड दुवा ठरतील. कर्जत रेल्वे स्टेशनवर फास्ट गाड्या थांबायला पाहिजेत तसेच रेल्वेवर एक उड्डाण पुलाची आवश्यकता आहे. आता मी भारतीय जनता पक्षाचा प्रदेश अध्यक्ष आहे आणि हे विषय मार्गी लावण सोप आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांचे थांबे, पुलाचे रुंदीकरण मार्गस्थ करू. योग्य व्यक्ती योग्य ठिकाणी असणे गरजेचे आहे.

सुरेश लाड यांनी, कर्जतकर योग्य निर्णय घेतील. पक्ष नेतृत्वाने आदेश दिल्याने माझ्या सून बाईंना उमेदवारी दिली. कर्जत शहराचे प्रश्न वेगळे आहेत. कर्जत शहरात येण्यासाठी गुंडगे भागाला त्रास होतो. अशा अनेक समस्या सोडविण्याची आवश्यकता आहे. महायुतीची सत्ता आल्यास या समस्या सोडविणे सोपे होईल, असे स्पष्ट केले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी, कर्जतमध्ये महायुतीची सत्ता येईल यात शंका नाही. आपण सर्व मिळून कर्जतचा सर्वांगीण विकास करू, असे सांगितले.

महेंद्र थोरवे यांनी, कर्जतचा विकास करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्नपणे प्रयत्न करीत आहे. कर्जतचे नंदनवन करण्याचे माझे स्वप्न आहे. त्या दृष्टीने वाटचाल सुरू आहे. कर्जत शहरासाठी ५८ कोटी रुपयांची नवीन पाणी पुरवठा योजना आणली असून तीचे काम सुरू आहे. आपल्याला महायुतीचा झेंडा पुन्हा एकदा फडकवायचा आहे. नरेंद्र मोदींच्या मुळे जेडीपी ८. २ टक्के पर्यंत गेला आहे. विकास अधिक गतिमान करण्यासाठी महायुतीच्या हाती सत्ता द्या.

दरम्यान, संकेत भासे, राजेश लाड, सुनील गोगटे, अभिषेक सुर्वे, राहुल डाळिंबकर, ॲड. हृषीकेश जोशी, वसंत भोईर यांनी आपली मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन समीर सोमणे यांनी केले.

# पालिका निवडणुकीसाठी प्रशासनाची तयारी

## शासकीय कर्मचारी मतदान केंद्रांकडे रवाना

**मुरूड : प्रतिनिधी**



आज २ डिसेंबर रोजी मुरुड नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूक सपन्न होणार आहे. यासाठी प्रशासनाकडून जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. मतदान कामासाठी माध्यमिक हायस्कूल व जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकवृंद घेण्यात आले आहेत. आज सर्व शिक्षकवृंद मुरुड तहसील कार्यालयाजवळ जमले असून प्रत्येक बूथचा ताबा त्यांनी घेतला आहे.

निवडणूक निर्भय वातावरणात होण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मुरूड नगर परिषदेमध्ये एकूण मतदार ११ हजार ५४४ एवढे आहेत. यामध्ये सर्वाधिक महिलांची संख्या आहे. मुरुड शहरातील ६१०४ महिला आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. तर पाच हजार ४४० पुरुष मतदार मतदान करणार आहेत. मुरूड नगरपरिषद निवडणुकीत प्रथमच १७ नगरसेवक संख्या ही आता २० झाली आहे. व एक थेट नगराध्यक्ष निवडून येणार आहे. मुरुड शहरासाठी १७ मतदान केंद्र उभारण्यात आली आहे. यासाठी १७ ईव्हीएम मशीन वापरण्यात येणार आहेत.

मुरुड नगरपरिषद निवडणुकीत थेट नगराध्यक्ष पदासाठी तीन उमेदवार उभे आहेत. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शिवसेना व शेकाप उमेदवार उभे आहेत. तर नगरसेवक पदासाठी एकूण उमेदवार ६१ रिंगणात असून ते आपले नशीब आजमावणार आहेत. दहा प्रभागमधून थेट नगराध्यक्ष व २० नगरसेवक निवडून येणार आहेत.

मागील चार वर्षापासून नगर परिषद निवडणूक न झाल्याने चार वर्षाचा नगरपरिषद कारभार प्रशासक यांनी चालवला चार वर्षाच्या प्रदीर्घ कालावधी नंतर मुरूड नगर परिषदेस नगराध्यक्ष व नगरसेवक मिळणार आहेत. लोकांमध्ये सुद्धा या निवडणुकीची उत्सुकता असून मुरूड शहरामध्ये किमान ८० टक्केपेक्षा जास्त मतदानाची टक्केवारी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# बनावट तिकिटाद्वारे प्रवास करणाऱ्यांवर कारवाई

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे तिकीट तपासक प्रशांत कांबळे यांनी २८ नोव्हेंबर रोजी वातानुकुलीत लोकलमध्ये बनावट युटीसद्वारे तयार केलेल्या सीझन तिकिटांसह प्रवास करणारे तीन प्रवाशी पकडले.काही दिवसांपूर्वी घडलेल्या अशाच दोन घटनांनंतर बनावट तिकिटांवर प्रवास करणारे प्रवासी ओळखले जाण्याचे हे आणखी एक प्रकरण आहे.

मुंबई विभागाचे प्रवासी तिकीट निरीक्षक प्रशांत कांबळे यांना इतर तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांसह आणि ड्युटीवर असलेल्या आरपीएफ कर्मचाऱ्यांसह ६.४५ वाजता परळ-कल्याण वातानुकुलीत लोकलमध्ये नियमित तपासणी दरम्यान तीन प्रवासी, म्हणजेच एक तरुणी आणि दोन तरुणांना यूटीएस जनरेटेड सीझन तिकिटे दाखवणारे आढळले. मोबाईल फोनमधील माय फाइल्स-डॉक्युमेंट्स या फोल्डरमधून ही तिकिटे उघडून दाखवण्यात आली होती. तिकीट परीक्षकांनी तिकिटे युटीएस ॲपमधून उघडून दाखवण्यास सांगितल्यावर ती तिकिटे उघडता न आल्याने त्यांना संशय आला.

सर्व ३ युटीस सीझन तिकिटांची बारकाईने तपासणी केली असता, असे आढळून आले की सर्व ३ प्रवाशांचा णढ्ड क्रमांक -दजजगक्छ४५६९ होता (प्रत्येक युटीस जनरेटेड तिकिटाचा नेहमीच वेगळा क्रमांक असतो), परंतु इतर तपशील वेगळे होते. पडताळणीसाठी सर्व ३ प्रवाशांचे मोबाईल नंबर पाठवले, ज्यावरून पुष्टी झाली की या क्रमांकांद्वारे कोणतेही तिकीट जारी केले गेले नाही आणि तयार केलेली युटीस तिकिटे बनावट असल्याची पुष्टी झाली. या प्रवाशांना आवश्यक कारवाईसाठी शासकीय रेल्वे पोलिस कुर्ला यांच्याकडे सोपवण्यात आले.त्यानंतरच्या तपासात असे दिसून आले की बनावट सीझन तिकिटे एआयने तयार केली होती. भारतीय न्याय संहिता कायदा २०२३ (बीएनएस) कलम ३१८/२, ३३६/३, ३३६/४, ३४०(१), ३४०(२) आणि ३/५ अंतर्गत बनावट तिकीट पद्धतींमध्ये सहभागी असल्याबद्दल ३ जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

# वारक येथे मोफत नेत्रचिकित्सा शिबिरास प्रतिसाद

## १५० जणांची तपासणी; २५ रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील वारक ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच वैष्णव साठे व डॉ.सुहास हळदीपूरकर लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने विघवली विभाग हायस्कुल विघवली येथे रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ यावेळेत मोफत नेत्रचिकित्सा शिबिर उत्साहात झाले.



या शिबिरात १५० रुग्णांची तपासणी करण्यात येऊन ९० रुग्णांना चष्मे वाटप करण्यात आले तर २५ नेत्र रुग्णांना लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पाली येथे नेऊन त्यांच्यावर यशस्वीपणे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. या शिबिराचे उदघाटन जेष्ठ नागरिक विठ्ठल वारेकर यांच्याहस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी संयोजक दत्तात्रय ठाकूर,वसंत साठे,सरपंच वैष्णव साठे,विठोबा दळवी आदी मान्यवरांसह वारक ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ,विघवली हायस्कुलचे शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उदघाटनपर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरोग्य सेवक डॉ. सुधीर खैरे यांनी केले.

या शिबिराला नेत्र रुग्णांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला. शिबिर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेलचे डॉ.कृष्णा, डॉ.धनश्री, कॉन्सलर सोनिया माळी, सहकारी महेश देशमुख यांच्यासह वारक ग्रामपंचायतीचे सरपंच वैष्णव साठे, अमित सापळे, प्रमोद शिंदे, सचिन उभारे, प्रवीण जाधव, भरत सुतार, नरेश कोळी व सहकारी यांच्यासह वारक ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पेणमधील दिव येथे दत्त जन्मोत्सव सोहळा

**पेण : प्रतिनिधी**

क्षेत्र श्रीक्षेत्र पिंगळाआळी देवस्थान दिव येथे श्री दत्त जन्मोत्सव सोहळा बुधवार ३ डिसेंबर व गुरुवार ४ डिसेंबरपर्यंत दोन दिवस उत्सव साजरा होत आहे.

बुधवारी अभिषेक व आरती संध्याकाळी वैदेही संकेत पाटील कळवे यांच्या संगीत भजनाचा कार्यक्रम, त्यांना पखवाज साथ संकेत पाटील यांची आहे. रात्री हभप वेदश्री वैभव ओक यांचे हरिदासी कीर्तन होईल, त्यांना तबला साथ सुभाष शांताराम पाटील व हार्मोनियम साथ संतोष शांताराम पाटील घोडाबंदर यांची आहे. गुरुवारी १२ वाजता दुपारी सूर्यकांत नाईक व देविचंद पाटील यांचे औदुंबर प्रासादिक भजन मंडळ दिव यांचा संगीत भजनाचा कार्यक्रम होईल, त्यांना मृदुंगसाथ अभिषेक पाटील यांची आहे. दुपारी हभप कृष्णा बापू पाटील दिवपाडा यांचे प्रवचन होईल सायंकाळी हभप वैदेश्री वैभव ओक यांचे कीर्तन होईल.

रात्री सागरबुवा भोरडे यांच्या जय गणेश प्रासादिक भजन मंडळ होनाड खोपोली यांचा संगीत भजन मंडळ होईल, त्यांना जोड भजन धीरज बुवा खंडागळे सुधागड पाली यांचा संगीत भजन होऊन कार्यक्रमाची सांगता होईल.

# कॉलेजच्या स्नेहसंमेलनात तरुणाईसाठी जीवन कौशल्य पुस्तकाचे प्रकाशन

**धाटाव : प्रतिनिधी**

तरुण पिढीला सक्षम, सजग आणि आत्मविश्वासपूर्ण बनवण्यासाठी सुदर्शन केमिकल कंपनीने एक मोलाची सामाजिक जबाबदारी पार पाडत जीवन कौशल्य नावाचे नवे आणि उपयुक्त पुस्तक प्रकाशित केले. द.ग.तटकरे महाविद्यालय, कोलाड येथे वार्षिक स्नेहसंमेलनाच्या विशेष सोहळ्यात हे पुस्तक सुदर्शन ग्रुपचे अन्सार डांगे, पराग फुकणे, अमर चांदणे, प्राचार्य तिरमले यांच्या हस्ते या पुस्तकाचे अनावरण करण्यात आले.




सध्याच्या बदलत्या जगात तरुणांना तर्कशक्ती, आत्मानुशासन, संवादकौशल्य, समस्या निराकरण क्षमता, भावनिक स्थैर्य आणि योग्य निर्णयक्षमता विकसित होणे अत्यंत आवश्यक झाले आहे. या सर्व घटकांचा समावेश असलेले हे पुस्तक विद्यार्थ्यांना व युवकांना नवी दिशा देणारे ठरणारे आहे.

जीवन कौशल्य विकासाचा हा संपूर्ण उपक्रम सुदर्शन केमिकल च्या सी.एस.आर विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या विशेष मार्गदर्शनातून साकारला आहे. माधुरी सणस मॅडम यांच्या मते विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे पाहणारा त्यांचा सकारात्मक आणि अभ्यासपूर्ण दृष्टिकोन या प्रकल्पाच्या मूळ कल्पनेत आहे, परंतु युवकांनी भावनिकदृष्ट्या मजबूत, सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि वैचारिकदृष्ट्या सक्षम व्हावे, या हेतूने जीवनकौषल्य पुस्तक प्रकाशित करण्याचा मानस सुदर्शनने हाती घेतला आहे.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत भूषण महाडिक यांनी सुदर्शन केमिकल कंपनीने राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि युवकविकास या क्षेत्रात सातत्यपूर्ण योगदान देणाऱ्या सुदर्शन केमिकलने ज्ञानातून परिवर्तन घडविण्याचा घेतलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले. यानंतर पराग फुकणे यांनी विद्यार्थ्यांनी सध्याच्या युगात ज्ञान संपादन करून ज्ञानाचे सामर्थ्य आणि त्याचा योग्य वापर करून जीवनाला कसे दिशा देऊ शकते, या विषयी आणि मोबाईल पासून वंचित राहणे, असे अत्यंत स्पष्ट आणि प्रभावी मार्गदर्शन केले.

ज्ञान हे शक्ती आहे, पण ही शक्ती जबाबदारीने वापरली पाहिजे, तेव्हाच ती समाजनिर्मिती घडवते, असा त्यांचा संदेश तरुणांना विचारप्रवर्तक ठरला.

दरम्यान, वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाच्या अनुषंगाने वर्षभरामध्ये अनेक उपक्रम व स्पर्धा घेण्यात आल्या असून यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

सूत्रसंचालन श्री.घोणे यांनी केले तर जुनिअर कॉलेज् इंचार्ज श्री. शिंपी सर, पर्यवेक्षक काळे, विज्ञान शिक्षक हाटे, खोडे मॅडम, विजय महाडिक-नॉन टीचिंग हेड तसेच सर्व शिक्षक/शिक्षिका वर्ग, कर्मचारी आणि विद्यार्थी उपास्थित होते, तर पुष्पा मॅडम यांनी आभार मानले.

# उंबरखिंड येथे शैक्षणिक सहलीत इतिहासाला उजाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

शौर्य, पराक्रम आणि इतिहासाला उजाळा देणारी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेची शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय पर्वणी ठरली. पाली-खोपोली मार्गावर वसलेल्या, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महान पराक्रमाची साक्ष देणाऱ्या समरभूमी उंबरखिंड येथे ही सहल झाली.





उंबरखिंडच्या दरीत पाऊल टाकताच विद्यार्थ्यांच्या डोळ्यांसमोर काळाचा पडदा सरकला आणि जणू १६६१ चा ऐतिहासिक दिवस त्यांच्या समोर उभा राहिला. कड्यावरून खाली झेपावणारे दगड, घनदाट जंगल, अरुंद मार्ग आणि भीमकाय कडे यांतून छत्रपती शिवाजी महाराजांनी आखलेली रणनिती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. इतिहास फक्त पुस्तकात न वाचता, ज्या भूमीत तो घडला, त्या भूमीत उभे राहण्याचा अतुलनीय रोमांच विद्यार्थ्यांनी अनुभवला. अल्प मावळ्यांनी प्रचंड मोघल सैन्य पराभूत केले. २ फेब्रुवारी १६६१ रोजी कारतलब खानाचे तीस हजार मोघल सैन्य कोकणावर धडक देण्यासाठी सज्ज झाले होते.

विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले की, रणनितीने लढली तर संख्या कधीच अडथळा ठरत नाही. नेताजी पालकर हे उंबरखिंडचे अद्वितीय सेनापती होते. या लढाईत छत्रपती शिवाजी महाराजांसह सर्वात महत्त्वाची भूमिका सरसेनापती नेताजी पालकरांची होती.

विद्यार्थ्यांना त्यांच्या पराक्रमाची सविस्तर माहिती देताना शिक्षकांनी सांगितले की, नेताजींच्या धडाडीच्या नेतृत्वामुळे मोघल फौजेला जबर धक्का बसला. त्यांची रणगर्जना, मावळ्यांचा वेग आणि प्राणाची बाजी लावून केलेले अद्भुत साहस विद्यार्थ्यांच्या मनात वीरतेची नवीन परिभाषा कोरून गेले. त्यांचा पराक्रम ऐकताना अनेक विद्यार्थ्यांच्या अंगावर अक्षरशः काटा उभा राहिला. गनिमी काव्याची जादू हा धडा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवला.

उंबरखिंडचे भूगोल, जंगल, अरुंद वाट आणि कड्यांची रचना पाहून विद्यार्थ्यांना समजले की छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धकला ही युगानुयुगे अभ्यासली जाणारी रणरचनेची विद्यापीठे आहेत. गनिमी कावा म्हणजे प्रचंड शत्रूला गुरफटून ठेवणे भूभागाचा फायदा करून घेणे. वेग, गती आणि कौशल्य वापरणे होय. कमी सैन्याने अधिक सैन्याचा पराभव करणे होय.

ही सर्व सूत्रे उंबरखिंडच्या दरीत जणू नव्याने जिवंत झाली. धाडसी खेळांनी वाढवला आत्मविश्वास वाढवला. ही सहल फक्त इतिहासापुरती मर्यादित नव्हती तर विद्यार्थ्यांनी तिरंदाजी प्रथमोपचार कौशल्य धाडसी आणि साहसी खेळ यांचीही प्रेरणा दिली. टीमवर्क आणि नेतृत्वगुण वाढवणारे उपक्रम आणि शौर्याचा मनमुराद आनंद घेतला. या खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवे आत्मविश्वास निर्माण झाले आणि शौर्य ही फक्त कथा नसून जीवनातील धडा आहे याची जाणीव झाली. उंबरखिंड सहल प्रेरणादायी इतिहासाचे जिवंत विद्यालय ठरली. या सहलीने विद्यार्थ्यांच्या मनावर अमिट छाप सोडली.

शिवरायांचे धाडस, नेताजी पालकरांचे साहस, मावळ्यांचा त्याग आणि मातृभूमीवरील निष्ठा उभी राहिली. या सर्वांनी विद्यार्थ्यांच्या मनात अभिमानाची ज्योत प्रज्वलित केली. उंबरखिंडची सहल विद्यार्थ्यांसाठी झाली. इतिहासाचा जिवंत धडा शौर्याचा अनुभव नेतृत्वाचे शिक्षण निसर्गातील रोमांच आणि आयुष्यभर लक्षात राहणारी प्रेरणा दिली.

# देशमुख महाविद्यालयात नेतृत्वगुण विकास शिबिर

**रोहा : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व कोकण एज्युकेशन सोसायटी डॉ.चिंतामणराव देशमुख वाणिज्य व सौ.कुसुमताई ताम्हाणे कला महाविद्यालय रोहा, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय निवासी जिल्हास्तरीय नेतृत्वगुण विकास शिबिर झाले. या शिबिरात रायगड जिल्ह्यातील एकुण ५२ महाविद्यालयातील निवडक ८९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



उद्घाटन उद्योजक अमित आठवले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांनी भूषविले. उद्घाटनावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे रायगड जिल्हा समन्वयक प्रा. तुळशिदास मोकल प्रा. शत्रुघ्न लोहकरे, डॉ. अनिल शिंदे, प्रा. सीमा भोसले, प्रा.सम्राट जाधव, प्रा. वैशाली कानवडे, प्रा. कृष्णा जांभेकर, प्रा.विनय शेलार आदी उपस्थित होते.

या जिल्हास्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश, ध्येय व इतिहास या विषयावर प्राचार्य डॉ.अतुल साळुंके, राष्ट्रीय सेवा योजनेचे नियमित व निवासी उपक्रम या विषयावर डॉ.श्रीकृष्ण तुपारे, संवाद कौशल्य या विषयावर डॉ.प्रवीण गायकवाड, सामुदायिक कार्यातील सामजिक समस्या या विषयावर डॉ.अनिल शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना व्यवस्थापन व संधी या विषयावर प्रा.तुळशिदास मोकल, व्यक्तिमत्व विकास या विषयावर डॉ.दत्ता हिंगमिरे, वेळेचे व्यवस्थापन या विषयावर डॉ. अनिल झेंडे, अहवाल लेखन व संपादन कौशल्य या विषयावर प्रा.शत्रुघ्न लोहकरे यांचे व्याख्यान झाले.

समारोप महाविद्यालय विकास समितीचे सदस्य लिलाधर थोरवे यांच्या उपस्थितीत व प्राचार्य डॉ. अतुल साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. आयोजनासाठी कोकण एज्युकेशन सोसायटी चेअरमन ॲड.सिद्धार्थ पाटील, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे विशेष कार्य अधिकारी प्रा.सुशील शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.रमेश देवकर यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले.

### राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# कुमारांमध्ये ठाणे ग्रामीण, तर कुमारींमध्ये पालघर संघ विजेता

**पुणे : प्रतिनिधी**

ठाणे ग्रामीण आणि पालघर या संघांनी अनुक्रमे ५२व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कुमार व कुमारी गटाचे विजेतेपद पटकाविले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमानपदाखाली पिंपरी चिंचवडच्या बोपखेल येथील दिवंगत श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे व राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान यांच्या विद्यमाने ही आमदार चषक कबड्डी स्पर्धा रंगली.





गतवर्षीदेखील हा चषक ठाण्याने पटकाविला होता, पण तो ठाणे शहर संघाने. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी रात्री उशिरा झालेल्या मुलांच्या शेवटच्या मिनिटापर्यंत अत्यंत रोमहर्षक झालेल्या अंतिम सामन्यात ठाणे ग्रामीण संघाने अहिल्यानगर संघाचा ३९-३७ अशा गुण फरकाने पराभव करून स्व. प्रभाकर नागो पाटील फिरत्या चषकाबरोबर आमदार चषक पटकाविला. मध्यंतरला ठाणे ग्रामीण संघ १६-२२ असा सहा गुणांनी पिछाडीवर होता, मात्र मध्यंतरानंतर जीतसिंग सैनी व स्मित पाटील यांनी जोरदार आक्रमण करीत अहिल्यानगरच्या अभिजित साळुंखे व सार्थक शिंदेचा बचाव भेदला. त्यामुळे मध्यंतरानंतर सामना ठाणे ग्रामीणच्या बाजूने झुकला. समन हरिजन याने सुरेख पकडी घेत संघाला विजय मिळवून देण्यात हातभार लावला.

कुमारी विभागात पालघरच्या संजना भोईर व हनी सोलमुत्तू यांच्या वेगवान चढाया तसेच काजल भोईरने केलेल्या पकडींमुळे पिंपरी चिंचवड संघाचा ५३-४५ असा पराभव करीत स्व. चंदन सदाशिव पांडे फिरता चषक व आमदार चषक पहिल्यांदा पटकाविला. मध्यंतराला पालघरकडे ३१-२० अशी आघाडी होती. सामन्याच्या पूर्वार्धातच संजना भोईर हिने जबरदस्त आक्रमण करीत पिंपरी चिंचवड संघावर दोन लोन लावत आपले ईरादे स्पष्ट केले. तिने निडरपणे खेळ करीत पिंपरी चिंचवडच्या सिद्धी गायकवाड व नम्रता सावंत यांचा बचाव भेदत संघाला चांगली आघाडी मिळवून दिली. ही आघाडी उत्तरार्धात कायम राखत सामना जिंकला. पिंपरी चिंचवडच्या संतोषी थोरवे व किर्ती कडगंची यांनी वारंवार पालघरचा बचाब भेदण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना यश न आल्याने त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. पिंपरी चिंचवडच्या सिद्धी गायकवाडने काही पकडी केल्या. स्पर्धेचे पारितोषिक वितरण अण्णा बनसोडे यांच्या हस्ते झाले.



# श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरणच्या द्रोणागिरी विभागातील नामांकित अशा श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात झाला. यामध्ये विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व तसेच वेगवेगळ्या खेळांबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

क्रीडा महोत्सवाच्या शुभारंभाला यश उदय जोशी यांची खास उपस्थिती लाभली. त्यांनी ऑल इंडिया इंटर युनिवर्सिटी किक बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२४, नॅशनल चॅम्पियनशिप ऑल महाराष्ट्र सीनियर चॅम्पियनशिप युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, बॉक्सिंग चॅम्पियनशिप अशा अनेक नामांकित स्पर्धांमध्ये प्राविण्य संपादन केले आहे. या वेळी त्यांनी वेगवेगळे प्रकारचे खेळ व त्यांचे महत्त्व तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळल्या जाणाऱ्या स्पर्धा व त्यांचे महत्त्व सांगितले.

उद्घाटन समारंभास विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, कमिटी मेंबर सुनील पाटील, सीमा घरत यांच्यासह पालक प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी मान्यवरांचे आभार मानत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रकारे परेड सादर करत खेळाच्या शुभारंभाला शोभा आणली. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संगीत नृत्यही सादर केले तसेच वेगवेगळ्या खेळांचे प्रात्यक्षिक दाखवले.










पनवेल : विधानसभा मतदारसंघातील महिलांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेनुसार आणि प्रयत्नातून प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत घरघंटी व शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत निवड झालेल्या चार हजार २५० पात्र लाभार्थींना सोमवारपासून शिलाई व घरघंटी मशीनचे वाटप करण्याचा शुभारंभ झाला.


## ।।१७ वे पुण्यस्मरण।।

"सर्व काही असूनही, काहीच नसल्यासारखे आहे...
सर्व सुखांनी भरलेले हे कुटुंब, आपल्यावाचून अपुरे आहे...
आपल्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली"



## कै. चौथुबाई हरी ठाकूर

आपले विनीत

श्री. रामशेठ ठाकूर, श्री. काना हरि ठाकूर,
श्री. अरुण हरि ठाकूर, सौ. तुळसाबाई गो. घरत आणि ठाकूर परिवार, पनवेल.






सौजन्य : महादेव कांबळे, रोशन पाटील



वर्ष ४२ वे ।।ॐ श्री बाळकृष्णाय नमः ।। स्थापना १९८३

## मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह

## श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर



श्री. चांगू काना ठाकूर
श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर

अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सदगुरू बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये **श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर,** यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरु चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ।।१३।।, शके १९४७, बुधवार दि.०३/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ।।१५।। । पौर्णिमा पौर्णिमा श शके १९४७, शुक्रवार दि.०५/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरुबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

### : कार्यक्रम :

| | |
|---|---|
| | **बुधवार दि. ०३/१२/२०२५** |
| सकाळी ८.३० ते १० दिंडी सोहळा संगीत भजन | देवसागर साधक समाज बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा), बुवा गणपत ठाकूर, नितिन ठाकूर पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे (न्हावा) सर्व गुरुबंधू भगिनी |
| सकाळी १० ते १२ : प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर श्री. भागवत साहेब, पुणे. ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळूण श्री. रमण ठाकूर, न्हावाखाडी, श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी २ ते ४ : संगीत भजन | भावभक्ती महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर गायीका सो. रत्नप्रभा घरत, श्रीमती. हिरुबाई घरत, सौ. चंद्रप्रभा घरत. सौ. आनंदी घरत श्री. गुरुकृपा प्रासदिक भजन मंडळ, खारकोपर गायीका: सुप्रिया घरत, पखवाज : तुषार घरत (चिर्ले उरण) |
| दुपारी ४ ते ६ : संगीत भजन | संत जनाबाई प्रासदिक भजन मंडळ गायिकाः सौ. पुनम ठाकूर, सौ. रुपम वास्कर, हर्षद फडके, पखवाजः केतन फडके |
| सायं ६ ते ७ : आरती | माऊलींची आरती |
| सायं ८ ते ९ : संगीत भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर बुवा : वसंतशेठ पाटील, देवानंद कोळी, नितीन ठाकूर (खारकोपर), पखवाज : श्री. गौरव म्हात्रे (गव्हाण), तुकाराम कोळी (गव्हाण) |
| रात्री ९ ते ११ : किर्तन | ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे, श्री क्षेत्र पाटणोली (पनवेल) वादक ह.भ.प. आदित्य पाटील, गायक : ह.भ.प. कल्पेश पाटील, अदित्य पाटील, विनायक पाटील |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग |
| | **गुरुवार दि.०४/१२/२०२५** |
| सकाळी ८ ते १० : भजन | श्री. राधाकृष्ण भजन मंडळ, शिवाजीनगर, बुवा : रशिक कानडा आणि मंडळी पखवाज : कु. परितोष हातचांगे (बेलपाडा), तबला रुतुजा कानडा |
| सकाळी १० ते १२ : प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर श्री. भागवत साहेब. पुणे. ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळूण |
| दुपारी २ ते ४ | श्री विश्वभर भजन मंडळ, गव्हाण, गायक हेमंत कोळी, पखवाज प्रशांत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ४ ते ५ | विठ्ठल रुखमाई हरिपाठ मंडळ, कोपर, गायीका सौ. अनुसया घरत, सो. इंदुताई म्हात्रे, सौ. नंदा पाटील. सौ. आनंदी घरत, सौ. अनिता म्हात्रे, सौ. वासंती ठाकूर, वादक : दिनेश घरत |
| सायं ५ ते ६ | दत्त जन्मोत्सव |
| सायं ८ ते ९ : भजन | एकादशी भजन मंडळ, न्हावे- बुवा : रामनाथ पाटील आणि मंडळी |
| रात्री ९ ते ११ : किर्तन | श्री. ह.भ.प. प्रकाश महाराज पाटील आणि मंडळ, कुंडेवहाळ |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, रमन ठाकूर, शिवाजी ठाकूर, गजानन ठाकूर. पद्माकर ठाकूर (न्हावा खाडी). पांडूरंग रसाळ, आत्माराम मोकल, पद्माकर ठाकूर (शिवाजीनगर), किसन मोकल, मधुकर ठाकूर, (गव्हाण) सर्व गुरुबंधू भगिनी |
| | **शुक्रवार दि.०५/१२/२०२५** |
| सकाळी ८ ते १० : भजन | नादब्रम्ह साधना भजन मंडळ (रांजणपाडा ओवेपेठ) बुवा : निवृत्ती चौधरी, मंगेश चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), पखवाज: निलेश पाटील |
| सकाळी १० ते १२ : प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| दुपारी १२ वाजता | श्री बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी |

देवसागर साधक समाज श्री स. स. बाळकृष्ण महाराज यांच्या १२५ वा जयंती निमीत्त दिंडी सोहळा बुधवार दि. ०३/१२/२०२५ रोजी सकाळी ०८.३० ते १०.३० वाजे पर्यंत.

कार्यक्रमाचे ठिकाण : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल.

व्यवस्थापक : देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) शिवाजीनगर - गव्हाण - न्हावेखाडी - कोपर (संचलित)

संयोजक : श्री. रामशेठ ठाकूर माजी खासदार आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com